दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३४७ I गुरुवार ०१ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## 'गाव विकणे आहे...' १६ दिवसांनंतर आंदोलन स्थगित

**सोलापूर :** माढा तालुक्यातील सीना–माढा उपसा जलसिंचन योजनेचे हक्काचे पाणी मिळत नसल्याने 'गाव विकणे आहे' असा फलक लावून आंदोलन करणाऱ्या तुळशी ग्रामस्थांनी अखेर १६ दिवसांनंतर आंदोलनाला तात्पुरती स्थगिती दिली.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बुधवारी तुळशी गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. पाणीपुरवठा योजना, तलाव व अन्य जलस्रोतांची पाहणी केल्यानंतर त्यांनी ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रस्तावित योजनांना मंजुरी मिळवून पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर दर दहा दिवसांनी आढावा घेण्यात येईल, तसेच त्याची माहिती ग्रामस्थांना दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी चावडीवरील 'तुळशी गाव विकणे आहे' हा फलक स्वतः खाली उतरविला. 'तुमच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आंदोलन स्थगित करीत आहोत; आम्हाला न्याय द्या,' अशी विनंती ग्रामस्थांनी केली.

# कळसूत्री बाहुल्यांचे मोदी-शाह सूत्रधार

## निवडणूक आयोगाविरोधात ६ ऑक्टोबरला 'लोकशाही वाचवा' मोर्चा; इंडिया आघाडीचे २० पक्ष एकवटले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदार याद्यांमधील कथित फेरफार आणि ईव्हीएम–व्हीव्हीपॅटच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीने केंद्र सरकार व निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राजधानीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान देशभर आंदोलन, तर ६ ऑक्टोबरला दिल्लीतील निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर 'लोकशाही वाचवा' मोर्चा काढण्याची घोषणा केली.

खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर निवडणूक आयोगाला 'कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे' वापरत असल्याचा आरोप केला. 'मतांची चोरी होत आहे', असा आरोप करत आगामी निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्याची मागणीही



त्यांनी केली. मात्र, हे आरोप विरोधकांचे राजकीय दावे असून त्याबाबत निवडणूक आयोगाची बाजूही महत्त्वाची आहे.

या बैठकीला काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (यूबीटी), राजद, डावे पक्ष, **(पान ४ वर)**

### जिल्हाधिकारी कार्यालयांवरही मोर्चे

२ ते ८ ऑक्टोबरदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयांबाहेर 'लोकशाही वाचवा' मोर्चे व निदर्शने आयोजित करण्यात येणार आहेत. सामान्य जनता, तरुण, स्वयंसेवी संस्था आणि लोकशाहीसाठी कार्यरत संघटनांना आंदोलनात सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राष्ट्रपतींची भेट घेण्याचाही विरोधकांचा प्रयत्न आहे.

### एसआयआर, मतदार यादी आणि ईव्हीएमवर आक्षेप

इंडिया आघाडीने एसआयआर प्रक्रियेचा पुनर्विचार, मतदार यादीतील नावांची भर–वगळणी व दुरुस्तीची माहिती सार्वजनिक करणे, नाव वगळण्यापूर्वी मतदाराला सूचना व अपीलाची संधी देणे, तसेच भविष्यातील निवडणुकांसाठी एसआयआरपूर्वीच्या मतदार याद्या वापरण्याची मागणी केली आहे. ईव्हीएमऐवजी पुन्हा मतपत्रिका वापरण्याची मागणीही बैठकीत करण्यात आली.

## वरिष्ठाच्या त्रासाला कंटाळून लष्करी जवानाची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भिंगार परिसरातील जामखेड रोडवरील लष्करी वसाहतीत वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून एका लष्करी जवानाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना सोमवारी (दि. २८) सकाळी उघडकीस आली. अप्पाराव महादेव ठोंबरे (वय ३४, रा. क्वार्टर नं. १४३/२, क्वीन्स लाईन, आर्मी हॉस्पिटलमागे, जामखेड रोड, मूळ रा. दहिफळ वडमावली, ता. केज, जि. बीड) असे आत्महत्या केलेल्या जवानाचे नाव आहे

याप्रकरणी त्यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून दोन सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठोंबरे अहिल्यानगरमधील आर्मी एरियात कार्यरत होते. आरोपी नायब सुभेदार निलकमल आणि हवालदार सचिन खेडकर हे त्यांना कामाच्या ठिकाणी वारंवार मानसिक त्रास देत होते. आरोपींनी ठोंबरे यांच्या पत्नीविषयी अयोग्य उद्गार काढले होते, तसेच नोकरीत व्यवस्थित काम करू देणार नाही, वरिष्ठांकडे तक्रार करून अडचणीत आणू आणि हवी ती रजा मिळू देणार नाही,अशी धमकीही दिली होती. या सततच्या अपमानास्पद वागणुकीला आणि मानसिक त्रासाला कंटाळून ठोंबरे यांनी आर्मी एरियातील क्वार्टरमध्ये सोमवारी सकाळी गळफास घेत आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ **(पान ४ वर)**

## नगरमधील भंगारची दुकाने एटीएसच्या रडारवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अहिल्यानगर छत्रपती संभाजीनगर रोड वरील शेंडी परिसरात दहशतवाद विरोधी शाखेकडून बजावण्यात आलेल्या नोटीस व शासनाचे आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी तीन भंगार दुकानांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दहशतवाद विरोधी पथकाच्या या धडक कारवाईमुळे भंगार विक्रेत्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

**तीन दुकानदारांना नोटीसा : भंगार विक्रेत्यामध्ये खळबळ**

अहिल्यानगरच्या दहशतवाद विरोधी पथकाने ९ सप्टेंबर रोजी कलम १६८ नुसार भंगार दुकानदारांना नोटीस बजावून भंगार साहित्य खरेदी विक्री केल्याबाबतचे रजिस्टर ठेवणे आणि सीसीटीव्ही चालू ठेवणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र तपासा दरम्यान शेंडी परिसरातील मुंबई ऑटोमोबाईल भंगार दुकानदार किस्मत हजरल अली खान (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), न्यू गोसिय ऑटोमोबाईल भंगार दुकानदार फिरोज मोहम्मद अक्रम खान (रा. मुकुंद नगर, अहिल्यानगर) आणि फैजाने ताजू शरिया ऑटोम ोबाईल्स भंगार दुकानदार जाकीर आली फजर अली खान (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) या तीनही दुकानदारांच्या दुकानांमध्ये तपासणी केली असता त्यांनी भंगार खरेदी विक्रीचे कोणतेही रजिस्टर ठेवले नसल्याचे व दुकानाचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे आढळून आले. शासनाच्या व पोलिसांच्या आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे या तीनही दुकानदाराविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

# जिल्हा बँक निवडणूक बिनविरोधाला शिंदे सेनेकडून ब्रेक

## खताळ, मुरकुटे, लंघे अनुपस्थित ; राजकीय संघर्ष रंगणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू शिवसेनेचे सचिव राम रेपाळे यांच्या बैठकीने अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या बिनविरोधाला ब्रेक लागला आहे. यामुळे आता जिल्हा बँकेच्या पण निवडणुकीत राजकीय संघर्ष रंगणार आहे.

राम रेपाळे यांनी काल अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहावर जिल्ह्यातील भाजप आणि शिवसेना नेत्यांची एकत्रित बैठक घेत बँकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. राम रेपाळे यांच्या जिल्हा बँक निवडणूक संदर्भात अचानक एन्ट्रीने अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या राजकारणात नवीन समीकरणे उदयास येण्याची चिन्हे आहेत.

शासकीय विश्रामगृहावर बैठकीस रेपाळे यांच्यासह खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, अहिल्यानगर भाजपाचे शहराध्यक्ष संभाजी कदम, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे,



सिद्धार्थ मुरकुटे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष अरुण मुंडे, मनोहर पोटे, शेवगावच्या हर्षदा काकडे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बाबु टायरवाले, सुरेश पठारे अनिल शिंदे पारनेरचे सुजित झावरे, प्रवीण घुले दिलीप सातपुते यांच्यासह अनेक दिग्गज उपस्थित होते.मात्र आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आमदार भानुदास मुरकुटे हे अनुपस्थित होते.

ही निवडणूक लढली पाहिजे या निवडणुकीत शिवसेना ताकदीने उतरणार आहे. याबाबतची सर्व ती माहिती उपमुख्यमंत्री पक्षश्रेष्ठी एकनाथ शिंदे यांच्या कानावर घालण्यात आली असल्याचे यावेळी राम रेपाळे म्हणाले.

शेतकरी कष्टकरी हे कोणाला कंटाळले आहेत. बँकेला चांगले दिवस यावेत म्हणून आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत. जे बरोबर आहेत त्यांना आणि जे येतील त्या सर्वांना घेऊन ही निवडणूक लढविण्यात येईल. त्याची आम्ही चाचपणी केली आहे, असे श्री. रेपाळे म्हणाले.सध्या राज्यात दुष्काळाचे सावट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतकऱ्यांच्या बांधावर जात आहेत. शेतकरी कष्टकऱ्यांना ते मदत करीत आहेत, असे श्री. रेपाळे यांनी सांगून बँकेच्या म ाध्यमातून बळीराजाला मदत व्हावी, अशी आमची इच्छा आहे. आमच्याबरोबर दोन खासदार आमदार आहेत. हे जनतेतून निवडून आले आहेत. ते तोला मोलाचे आहेत. कुणालाही विश्वासात न घेता बँक बिनविरोध करणे हे बरोबर नाही. शेतकरी कष्टकऱ्यांसाठी आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत, असे रेपाळे म्हणाले.

### अहंकार असेल तर निवडणूक होणारच : राम शिंदे

जिरवा जिरवीचे राजकारण बाजूला ठेवा असा सल्ला देतानाच अहंकार असेल तर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचा सज्जड इशारा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिला आहे. यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक ही अटळ आणि चुरशीची होणार असल्याचे संकेत आहेत.

## चांद्यामध्ये बेकायदेशीर दारूचा साठा पकडला

### १० लाख ८८ हजाराचा मुद्देमाल जप्त; चौघा विरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दादरा नगर हवेली येथून आणलेला बेकायदेशीर दारूचा मोठा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला. नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत चांदा येथे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत १० लाख ८८ हजार ८०० रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चौघा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार शेदवाड व पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, विकास साळवे ,अमृत आढाव व बाळासाहेब गुंजाळ यांचे पथक २९ सप्टेंबर रोजी सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, प्रवीण नानासाहेब घाडगे व राजेंद्र बापूराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेली विदेशी दारू दादरा नगर हवेली दमण व देव येथून केंद्रशासित प्रदेशातून कंटेनरने छुपा मार्गाने आणली आहे. त्यातील काही दारू संभाजी कचरू गायकवाड (रा. चांदा, ता. नेवासा) यांच्या घरासमोर पांढऱ्या **(पान ४ वर)**

## शिर्डीत पोलिसांची मोठी कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीत मोबाईल चोरी संदर्भात दम दार कारवाई करत अहिल्यानगर व नाशिक हद्दीत चोरी केलेले नामांकित कंपनीचे ५५ मोबाईल शिर्डी पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले आहेत.

**५५ मोबाईल जप्त, मात्र दोघे फरार**

दि . २९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास शिर्डी परिसरात होणाऱ्या म ालविरुद्धच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार लांडे, पोलीस कॉन्सटेबल नालेगावकर, सूर्यवंशी आणि इनामदार हे गस्त घालत होते. दरम्यान, दत्तनगर, शिर्डी येथे काही इसम झारखंड येथून काही दिवसांपूर्वी येऊन एका घरामध्ये राहत असल्याची आणि त्यांची हालचाल संशयास्पद असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खात्री करण्यासाठी पोलीस पथक संबंधित ठिकाणी गेले असता, दोन इसम घराच्या मागील बाजूकडील दरवाज्यातून अंधारात स्वतःचे अस्तित्व लपवण्याच्या **(पान ४ वर)**

## 'माणिक इन्फ्राला कोणतीही विशेष सवलत दिली नाही'

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे स्पष्टीकरण; 'नियमांनुसारच कंत्राटे'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संभाजीनगर :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी झालेल्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर 'माणिक इन्फ्रा' या कंत्राटदार कंपनीला जलसंपदा विभागाकडून विशेष सवलत दिल्याचा आरोप चर्चेत आला होता. या आरोपांवर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्टीकरण देत, 'माणिक इन्फ्रा'ला कोणतीही विशेष सवलत देण्यात आलेली नाही, असे स्पष्ट केले.

माणिक इन्फ्राला जलसंपदा विभागाकडून ७०० कोटी रुपयांहून अधिक रुपयांची कामे देण्यात आल्याचा दावा समाजमाध्यमांवर करण्यात आला होता. कंपनीचे कंत्राटदार किशोर बलांडे हे जरांगे पाटील यांच्या संपर्कातील असल्याचेही सांगितले जात होते. यामुळे कंपनीला विशेष वागणूक मिळाल्याचा आरोप करण्यात आला.याबाबत पत्रकारांशी बोलताना विखे पाटील म्हणाले की, विविध पक्षांशी वेगवेगळे कंत्राटदार जोडलेले असतात. त्याचप्रमाणे माणिक इन्फ्राचेही कोणाशी संबंध असतील. मात्र, संबंधित कंपनीने नियमांच्या चौकटीत निविदा भरल्या असतील तर नियमानुसारच कामे देण्यात आली आहेत. कंपनीला नियमांच्या पलीकडे जाऊन कोणतीही मदत किंवा विशेष सवलत देण्यात आलेली नाही.दरम्यान, जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही कंत्राटदारांना नोटिसा देण्याची चर्चा तसेच संबंधित कंत्राटांबाबत समाजमाध्यमांवर करण्यात आलेले दावे यामुळे हे प्रकरण चर्चे त आले होते. विखे पाटील यांनी या आरोपांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## टंचाई परिस्थिती संधी समजून प्रकल्पांच्या सुविधा पूर्ण करा : ना. विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** प्रवरा, मुळा आणि गोदावरी लाभक्षेत्रात जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सुरू असलेली सर्व कामे मिशन मोडवर पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. ताजनापूरबाबत लवकरच बैठक घेणार असून, सध्याची टंचाई परिस्थिती ही संधी समजून प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा, निळवंडे आणि मुळा धरण समूहात सुरू असलेल्या कामांचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर येथील सिंचन भवन कार्यालयात आयोजित बैठकीमध्ये घेतला. नदीजोड प्रकल्पाची माहिती त्यांनी जाणून घेतली. बैठकीस मराठवाडा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक



जयंत गवळी, मुख्य अभियंता अरुण नाईक, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, नदीजोड प्रकल्पाचे गणेश हारदे, मनोज ढोकचौळे, अनिल सूर्यवंशी, गोदावरी प्रकल्पाच्या अभियंता सोनल शहाणे, मुळा प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, भंडारदरा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे, निळवंडे प्रकल्पाचे अमोल कवडे, प्रदीप हापसे तसेच ताजनापूर प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या सर्व प्रकल्पांतर्गत कामांची माहिती जाणून घेतली. सद्य:स्थितीत वांबोरी चारीच्या दुसऱ्या टप्प्याच्या ऊर्ध्वगामी नलिकेचे काम पूर्ण झाले असून, गुरुत्ववाहिनी नलिकेचे काम ४० टक्के पूर्ण झाले असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. कामाला गती देण्याबाबत अधिकाऱ्यांनी अतिशय गांभीर्याने निर्णय करून डिसेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे मंत्री विखे पाटील यांनी सूचित केले.

निळवंडे डावा आणि उजवा कालव्यावरील शाखा कालव्यांच्या अस्तरीकरणाचे काम सतरा टक्के पूर्ण झाले आहे. बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे काम तीस टक्के पूर्ण झाले असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सर्व कामे जून २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना मंत्र्यांनी बैठकीत दिल्या. जिल्ह्यातील ताजनापूरच्या प्रकल्पाचा आराखडा जाणून घेत प्रश्नाबाबत बैठक आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले.

नदीजोड प्रकल्प व वळण योजनांच्या कामाचा आढावाही बैठकीत घेण्यात आला. उल्हास–वैतरणा–गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी सर्वेक्षण आणि प्रकल्प अहवाल तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, लवकरच नदीजोड प्रकल्पाच्या लाभक्षेत्राची पाहणी अधिकाऱ्यांसमवेत करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याची गरज

अल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाचे महासंकट उभे ठाकले आहे. राज्यातील तबबल २६५ तालुक्यात शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. हि संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. परतीच्या पावसाने दगा दिला तर हे संकट आणखीच भीषण रूप धारण करणार आहे. यामुळे शेती क्षेत्र आणि शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण आहे. येऊ घातलेल्या संकटाने शेतक-यांचां खचत असल्याचे भेसूर वास्तव समोर येत आहे.मुख्यमंत्री, मंत्री, विरोधक बांधावर जाऊन धीर देत आहेत. मात्र शेतकरी धाय मोकलून हंबरडा फोडतीय असे काळीज पिळवटून टाकणारे चित्र जागोजागी दिसत आहे.

गेल्या दोन दशकांपासून बदलत्या हवामान, नैसर्गिक संकटाच्या ससेमिऱ्याने शेती व्यवसाय उध्वस्त झालाय तर शेतकरी मोडून पडलाय.यातून येणाऱ्या नैराश्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं सत्र सुरू आहे. या दोन दशकांत अनेक सरकारे आली आणि गेली. शेतकऱ्यांच्या समस्या मात्र आहे तिथेच राहिल्या. एकामागून एक साथीच्या रोगाप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना, शासनकर्त्यांना त्याची गांभीर्याने दखल घ्यावी वाटत नाही. जो शेतकरी देशातील जनतेची भूक भागवतो, त्याच शेतकऱ्यांवर जीव द्यायची वेळ येते, यापरती शोकांतिका नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा मागोवा घेण्यासाठी न्यायालयाने 'टाटा सोशल सायन्सेस'ची नियुक्ती केली होती. या संस्थेच्या अहवालात शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबतची कारणमीमांसा दिलेली आहे. सत्तेच्या राजकारणात मश्गुल असणारे राज्यकर्ते, विरोधी पक्षाचे नेते, खासदार, आमदार आणि शेतकऱ्यांच्या संघटनेचे नेते, यापैकी किती जणांनी हा अहवाल वाचला आणि त्यावर अभ्यास करून संसद किंवा विधानसभेत किंवा चळवळीडरे आवाज उठविला? खासदार, आमदारांचे भत्ते एकमताने मान्य होतात. नोकरदारांना खुश ठेवण्यासाठी सातवा वेतन आयोग लागू होतो. शेतकऱ्यांसाठी मात्र तिजोरीत खणखणाट असल्याचे सांगितले जाते.अशा दिवट्या राजकारण्यांना आणि संघटनांच्या नेत्यांना खरंच शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून घेण्याचा नैतिक अधिकार आहे का, हा प्रश्न आहे. एका शेतकऱ्याचा जीव जातो. त्यावर गांभीर्याने व तळमळीने चर्चा होण्याऐवजी, एकमेकांवर आरोपांची गरळ ओकली जाते. राज्यकर्ते आणि राजकारण्यांचं असं वागणं, हे मुर्दाड मनाचं प्रतीक आहे. तसेच शेतकऱ्यांच्या संघटनांनीही बघ्याची भूमिका घ्यावी, हे देखील बोटचेपणाचं लक्षण आहे.




दोन दशकांपासून देशात नव्या व खुल्या अर्थव्यवस्थेचे वारे घोंघावू लागले. या अर्थव्यवस्थेने माणसाला पैशांचं वेड लावलं. पैसा, पैसा, पैसा, पुढे कोण पुढे तो, अशी पैशासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. गावे ओस पडू लागली आणि शहरे विस्तारू लागली. माणसं, नातं, गोतं यावर पैशानं मात केली. नव्या अर्थव्यवस्थेत माणूसपण नको, तर व्यवहार महत्त्वाचा. पैशाच्या या झगमगणाऱ्या दुनियेची सगळ्यांना भुरळ पडली. यातून 'चंगळवाद' अवतरला. झगमगाटाच्या दुनियेत शेतकऱ्याला स्थानच उरलं नाही. खुल्या अर्थव्यवस्थेने शेतकऱ्याला नागवलं. त्यामुळे शहरांमध्ये चंगळवाद तर गावाकडं मात्र 'कंगालवाद' वाढला. चंगळवाद व कंगालवाद यातील वाढत चाललेली दरी कोणाच्याही लक्षात आली नाही. या दरीने माणसाला माणसापासून दूर नेलं. शहराकडे गेलेले सुतळे; पण गावांत राहणारे मात्र नैराश्याच्या गर्तेत अडकले.

आज शेतीची काय अवस्था आहे? शेतातलं पीक म्हणजे उध्वस्तावरचं धन. अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, अवकाळी अशा कोणत्याही नैसर्गिक आपत्तींना यावं आणि हे धन लुटावं, असं दुष्टचक्र शेतकऱ्यांच्या मागे लागलंय. धाम गाळून पिकवायचं अन् कवडीमोल विकायचं, यामुळे घेतलेलं कर्जही फिटत नाही. त्यात घरातील पोरांना शिकवायचं. पोरीबाळी उजवायच्या. या चिंतेनं बापाच्या मनाची घालमेल होते. बायकापोरांची होत असणारी तारांबळ, घुसमट घराच्या कर्त्याला देखवत नाही. दुनियेला पोसणारे असून, आपली पोरं मात्र उपाशी, याची सल त्याला अस्वस्थ करते. अखेरीस या घुसमटीतून सुटायचा, बाहेर पडायचा एकच रस्ता त्याला दिसतो, जीवन संपविण्याचा!शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे एक मोठी सामाजिक समस्या म्हणून राज्यकर्ते, राजकारणी, प्रसार माध्यमे, शेतकऱ्यांच्या संघटना आणि जनतेनं संवेदनशीलतेनं बघितलं पाहिजे. आत्महत्या झाली की, क्षणभर हळहळणे, प्रतिक्रिया देणे, मदतीचा चेक देऊन शासकीय मलमपट्टी करणे, हे थांबले पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या मुळाचा शोध तातडीने घेतला पाहिजे. तात्पुरत्या मलमपट्टीपेक्षा दीर्घकालीन उपाययोजना आखल्या पाहिजेत.सहाव्या वेतनाने गलेलठ्ठ झालेल्यांना आठवा वेतन आयोग नेमणे, उद्योग व कॉर्पोरेट जगाचे चोचले पुरविणे, हा प्रकार थांबला पाहिजेत. शेतमालाला शाश्वत भाव मिळवून देणारा सक्षम कायदा अंमलात आणला पाहिजे. त्याचबरोबर शेतीसाठी शून्य दराने कर्जपुरवठा उपलब्ध केला पाहिजे. कर्जमाफीपेक्षा शेतकऱ्यांत कर्ज फेडीची क्षमता निर्माण केली पाहिजे. दुष्काळाचे महासंकट केवळ शेतकरीच नाही, तर देशातल्या प्रत्येक घटकाला झटका देणार आहे. त्यामुळं शासनकर्त्यांना यापुढे बदलत्या हवामानावर आधारित धोरणे आखवी लागतील.अशातऱ्हेची धोरणे व उपाययोजना करून शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याची नितांत गरज आहे.

# कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशनची ५५ वी वार्षिक सभा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन माजी आ. अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली गौतम पब्लिक स्कूलच्या सभागृहात गुरुवार दि.२४ रोजी सपंन्न झाली. यावेळी स्व. कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले.

अध्यक्ष पदाची सूचना प्रविण शिंदे यांनी मंडळी तर अशोक मुरलीधर काळे यांनी अनुमोदन दिले. संस्थेचे विश्वस्त भास्करराव आवारे यांनी दिवंगत झालेले सभासद, मान्यवर, हितचिंतक, कर्मचारी यांच्या श्रद्धांजलीचा ठराव मांडला. त्यानुसार सर्व उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. विषय पत्रिकेप्रमाणे सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली. विषय पत्रिकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे विश्वस्त तसेच आमदार आषुतोष काळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलताना संस्थेचे संस्थापक स्वर्गीय कर्मवीर शंकररावजी काळे यांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न संस्थेमार्फत निरंतरपणे सुरु आहे. संस्थेने शैक्षणिक कार्याबरोबरच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असून संस्थेचा ठसा उमठवीत आहे. याबद्दल सर्व शाखांचे प्राचार्य यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणाचा विचार करता आपल्या शैक्षणिक संस्थेत पुढील वर्षी गौतम पब्लिक स्कूल अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणार असून याकरिता प्रयत्नशील आहे. जेणे करून ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागातील शिक्षणाचा लाभ कमी खर्चात आपल्या संस्थेमार्फत घेऊ शकतील त्याकरिता उच्च दर्जाचे होस्टेल सुविधा खास करून मुलींच्या दृष्टीने तयार करण्याचे संस्थेमार्फत प्रयत्न केले जाणार आहे याडरे संस्थेचे संस्थापक स्वर्गीय कर्मवीर शंकररावजी काळे यांचे स्वप्न पूर्ण करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे हेडक्लर्क केशव दळवी यांनी अहवाल वाचन केले.

यावेळी माजी आ. अशोकराव काळे, विश्वस्त आ. आशुतोष काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, संस्थेचे विश्वस्त भास्करराव आवारे, बाबासाहेब कोते, मधुकर बडवर, डॉ.चंद्रशेखर आव्हाड, अशोक काळे, ज्ञानदेव मांजरे, अक्षय काळे, प्रवीण शिंदे, मधुकर घुमरे, बाळासाहेब बारहाते, बाळासाहेब कदम, वाल्मिक नवले, राधुजी कोळपे, सय्यद मुस्ताक सिकंदर पटेल, राजेंद्र कोळपे, संस्थेचे इन्स्पेक्टर नारायण बारे, गौतम पब्लिक स्कूलचे प्राचार्य नूर शेख, सौ.सुशीलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यायाच्या प्राचार्या डॉ. विजया गुरसळ, गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिटयुटचे प्राचार्य वासिम शेख, न्यू इंग्लिश स्कूल देर्डे चांदवडचे मुख्याध्यापक प्रकाश देशमुख, न्यू इंग्लिश स्कूल काकडीचे मुख्याध्यापक बाळासाहेब गुडघे व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबिका महिला पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेची सन २०२५-२६ या कालावधीची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेच्या चेअरमन राधिका कृष्णा पवार यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या अंबिका सभागृह श्रीरामपूर या ठिकाणी उत्साही वातावरणात संपन्न झाली.

सभेच्या कामकाजापूर्वी सन २०२५-२६ या वर्षात दिवंगत झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अहवालाचे वाचन संस्थेच्या चेअरमन व सभेच्या अध्यक्षा राधिका पवार यांनी केले. मागील सभेचे इतिवृत्त, आर्थिक पत्रकाचे वाचन नफा-विभागणी अंदाजपत्रक लेखापरीक्षण सन २०२६-२७ करीता लेखापरीक्षकाची निवड, कर सल्लागार नेमणूक तडजोडीने वसुली केलेल्या कर्जखाते विषयाची दुरूस्ती या बाबतची माहिती व्यवस्थापक आण्णासाहेब कचरु जाधव यांनी नमूद केली.

सन २०२५-२६ या वर्षात निव्वळ नफा रु. (१,०८,५३,१८४/-) अक्षरी १ कोटी ८ लाख ५३ हजार एकशे चौर्यांशी इतका झाला असून सदर नफा विभागणीतून १०% प्रमाणे लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच वर्षाअखेर १३२ कोटी ३० लाख ३२ हजार च्या ठेवी झाल्या असून ठेवीमध्ये गत वर्षापेक्षा १३ कोटीने वाढ झालेली आहे. तरलतेपोटी ६१ कोटी ८० लाख ७८ हजार ची गुंतवणूक केलेली असून संस्थेकडे स्थावर मालमत्ता ३ कोटी ५४ लाख ९ हजाराची आहे. संस्थेचे सर्व कामकाज संगणकीकृत असून बँक सुविधेनुसार सर्व सुविधा दिल्या जातात. आर्थिक वर्षासाठी त्यामुळे संस्थेला ऑडीट वर्ग अ मिळाला असून तो सातत्याने राखने कामी सर्व संचालक सेवक वर्ग व ठेव प्रतिनिधी यांचे आदर्शवत कामकाज दिसून येते.

# सापडलेला आय फोन १०८ चालकाने केला परत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री क्षेत्र शनी शिंगणापूर फाटा येथे बापू किसान काळे (वय ७५ रा .नांदूर ता. आष्टी) याचा अपघात झाला होता. या प्रसंगामध्ये घाबरलेल्या अस्वस्थेत घटनास्थळी हरवलेल्या वस्तू गायब झाल्याचे सोडून दिल्या होत्या, काही दिवसांनी चालक राशींनकर यांनी ओळख पटून हरवलेला मोबाईल काळे यांना पत्रकार विजय खंडागळे यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. त्यावेळेस सोनई १०८ ॲम्ब्युलन्स ने तात्काळ सेवा देऊन एक नव्या आयुष्यला सुरवात करून जीवदान दिल व त्यांना नगर सिव्हिल हॉस्पिटल मध्ये ऍडमिट केले .त्यावेळेस नजर चुकीने रुग्णावाहिकांमध्ये रुग्णाचा महागडा विवो कंपनीचा मोबाईल १०८ ॲम्ब्युलन्स मध्ये असल्याचे चालक अशोक राशींनकर यांच्या निदर्शनास येताच अशोक राशींनकर यांनी प्रामाणिकपणे दर्शन घडवले आहे, त्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.पत्रकार विजय खंडागळे यांच्या हस्ते काळे कुटूंबियांना मोबाईल प्रामाणिक परत केला. त्यावेळेस १०८ रुग्णवाहिकचे पायलट अशोक राशीनकर, पोपट केकान ,१०८ चे अधिकारी डॉ. अतुल दराडे, डॉ बाबासाहेब शिरसाठ, सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर , सचिन साळवे आणि सोनई प्राथमिक आरोग्य केंद्रचे वैद्यकीय अधिकारी डॉ दीपक पवार यांच्या साक्षीने मोबाईल परत करण्यात आला.




# बस आगारात स्नेहलताताई यांची अचानक धाड,प्रवाशांच्या गैरसोयीवर अधिकाऱ्यांना खडसावले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :**आगारातील बससेवा, प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा, स्वच्छता आणि महिला सुरक्षेची पाहणी करण्यासाठी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी अचानक आगाराला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी अनेक बस नादुरुस्त असल्याने प्रवाशांना, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना रस्त्यातच त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी बस आगारातील अधिकाऱ्यांना जाब विचारत तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

बसस्थानक परिसरातील अस्वच्छता, स्वच्छतागृहांमध्ये आवश्यक सुविधांचा अभाव तसेच प्रवाशांसाठीच्या मूलभूत सोयींची पाहणी करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना केल्या. हिरकणी कक्ष कुलूपबंद असल्याचे आढळून आले. तसेच बसस्थानकाच्या पूर्व बाजूस मैलमिश्रित पाणी मोठ्या प्रमाणात उघड्यावर वाहत असल्याचेही निदर्शनास आले. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बसस्थानक परिसरात टवाळखोरांकडून होणारा त्रास रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने आवश्यक ती कारवाई करून बंदोबस्त वाढवावा, अशा सूचना त्यांनी केल्या.

नागरिकांची गैरसोय होता कामा नये. प्रवासी, विद्यार्थी आणि महिला प्रवाशांना सुरक्षित व सन्मानजनक सुविधा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मी पुन्हा आगाराला भेट देणार असून, तोपर्यंत आज निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींमध्ये सुधारणा झालेल्या दिसल्या पाहिजेत,असे आ. स्नेहलता कोल्हे यांनी स्पष्ट केले.बसस्थानक परिसरातील खड्डे तातडीने बुजवावेत, बंद असलेले स्ट्रीट लाईट सुरू करावेत, प्रवाशांसाठी पंख्यांची व्यवस्था सुरळीत ठेवावी, तसेच स्वच्छता व महिला सुविधांकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी भाजपा शहराध्यक्ष व आरोग्य सभापती वैभव आढाव, महिला मोर्चा शहराध्यक्ष अनिता गाडे, अविनाश पाठक यांच्यासह कोपरगाव बस स्थानकातील प्रवासी नागरिक उपस्थित होते.

# ऊसाला प्रतिटन ५ हजार रुपये भाव द्या; १५ दिवसांत विनाकपात बिल अदा करा

## केळी उत्पादक शेतकरी संघाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम सर्जे यांची साखर आयुक्तांकडे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** सलग दोन वर्षे नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यंदाच्या गळीत हंगामात ऊसाला किमान ५ हजार रुपये प्रतिटन दर द्यावा. तसेच ऊस तुटल्यानंतर शेतकऱ्यांचे बिल नियमानुसार १५ दिवसांच्या आत कोणतीही अनावश्यक कपात न करता अदा करावे, अशी मागणी केळी उत्पादक शेतकरी संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम धोंडीराम सर्जे यांनी साखर आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदनाडरे केली आहे.



मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, तर यंदा पावसाअभावी अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर ऊस उत्पादनाचा वाढता खर्च भागविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. मजुरी, रासायनिक खते, कीटकनाशके, औषधे, मशागत, सिंचन, वाहतूक तसेच ऊसतोडणीच्या खर्चात मोठी वाढ झाली असून त्याच्या तुलनेत ऊसाला योग्य दर मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ऊस तुटल्यानंतर नियमानुसार १५ दिवसांत बिल अदा होणे अपेक्षित असताना काही साखर कारखान्यांकडून दोन ते तीन महिन्यांनंतरही देयके दिली जात नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे ऊस बिलातून कोणत्याही कर्जाची अथवा इतर रकमेची कपात न करता शेतकऱ्यांना संपूर्ण रक्कम वेळेत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मागील वर्षाचे ऊस बिल थकीत असलेल्या शेतकऱ्यांना थकीत रक्कम व्याजासह अदा करावी, असेही सर्जे यांनी म्हटले आहे.

ऊसाला परवडणारा दर न मिळाल्यास भविष्यात ऊस लागवडीवर परिणाम होऊन साखर कारखाने, कामगार, ऊसतोडणी मजूर, वाहतूकदार व हार्वेस्टर चालकांच्या रोजगारावरही परिणाम होऊ शकतो, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील व नेवासा तहसीलदार यांना देण्यात आल्या आहेत.

# उक्कलगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीची १०६ वी वार्षिक सभा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**उक्कलगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील सर्वात जुनी व सहकार क्षेत्रात आपला दबदबा कायम राखणाऱ्या उक्कलगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ३० सप्टेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेचे विद्यमान चेअरमन ऍड. पुरुषोत्तम थोरात यांनी या सभेचे अध्यक्षपद भूषविले. अशोक सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन तथा संस्थेचे मार्गदर्शक इंद्रनाथ पाटील थोरात यांच्या मार्गदर्शनखाली ही सभा पार पडली. संस्थेला 'ब' वर्ग ऑडिट प्राप्त झाले असून, २८३ सभासदांची नावे कर्जमाफी योजनेत समाविष्ट करण्यात आल्याची माहिती चेअरमन ऍड. पुरुषोत्तम थोरात यांनी दिली. यावेळी व्हा.चेअरमन बेबीताई थोरात, ज्येष्ठ



मार्गदर्शक बन्सीभाऊ थोरात, सचिव शिवाजी थोरात, मधुकर शिंदे, श्रीकांत जगधने, श्रीमती वैशाली थोरात, सुरेश मुसमाडे यांच्यासह संचालक मंडळ आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व सभासद उपस्थित होते.

सभेचे विशेष आकर्षण म्हणजे गावातील शैक्षणिक, कायदेशीर व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खालील मान्यवरांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यात ऍड. विद्या पोपटराव थोरात खंडकरी चळवळीचे नेते कॉम्रेड स्व. आण्णा पाटील थोरात यांची नात, जिने गावातील पहिली महिला वकील होण्याचा मान मिळवला आहे. प्रकाशराव गाडेकर यांनी खानापूर व उक्कलगाव शाळेत तब्बल ३२ वर्षे सेवा देऊन क्रीडा शिक्षक म्हणून निवृत्त झाले. सत्कारमूर्तीमध्ये डॉ. विराज महेश थोरात, डॉ. संकेत अनिल थोरात, कांचन सुनील थोरात आणि शिला अनिल पगारे यांचाही सन्मान करण्यात आला.

सभेची सुरुवात गतवर्षभरात दिवंगत झालेल्या संस्थेच्या सभासदांना श्रद्धांजली वाहून झाली. सचिव शिवाजी थोरात यांनी सभेचे इतिवृत्त वाचन केले. सूत्रसंचालन विकास शामराव थोरात यांनी केले, तर आभार संस्थेचे माजी व्हा. चेअरमन शरद दत्तात्रय थोरात यांनी मानले. या सभेस रवींद्र थोरात, आनंदा थोरात, सुनील थोरात, अनिल थोरात, बंडेराव तांबे, सुनील पारखे, बापुसाहेब चिंधे, संजय जगधने, गोरख थोरात, पंढरीनाथ मोरे, दत्तात्रय कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कोपरगावात पिकांचे सरसकट पंचनामे सुरु

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** :कोपरगावातील दुष्काळग्रस्त परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी शासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, संपूर्ण कोपरगाव मतदारसंघात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळ ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर नुकसानग्रस्त खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे.



आमदार आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.२८) रोजी महसूल, कृषी तसेच पंचायत समिती कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना पिकांचे पंचनामे तातडीने सुरू करून एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. या सूचनांची तत्काळ दखल घेत बुधवार (दि.३०) पासून महसूल, कृषी व पंचायत समिती कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांचे संयुक्त पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने कोपरगाव मतदारसंघातील खरीप पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली होती. सोयाबीन, बाजरी, मका यांसह विविध पिकांवर पावसाअभावी मोठा परिणाम झाला असून, उत्पादनात कमालीची घट होणार आहे. त्याचबरोबर पशुधनासाठी चारा व पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.पिके उभी करण्यासाठी शेतकऱ्यांनी आर्थिक अडचणींचा सामना करत मोठा खर्च केला होता. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून खरीप हंगामाची तयारी केली; मात्र पावसाने पुन्हा एकदा ओढ दिल्याने त्यांच्या मेहनतीवर संकट आले. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची वस्तुस्थिती आमदार आशुतोष काळे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून देत संपूर्ण कोपरगाव मतदारसंघ दुष्काळग्रस्त घोषित करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने संपूर्ण कोपरगाव मतदारसंघात दुष्काळ जाहीर करून दुष्काळ ट्रिगर-१ लागू केला आहे. त्यानंतर आता नुकसानग्रस्त पिकांचे संयुक्त पंचनामे सुरू झाल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. एकही नुकसानग्रस्त शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशा स्पष्ट सूचना आमदार आशुतोष काळे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्याचा अहवाल शासनाकडे तातडीने सादर करण्यासाठी महसूल व कृषी विभागाची यंत्रणा कार्यरत झाली असून, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी पुढील कार्यवाहीला वेग आला आहे.

# युवक महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो : मा. शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** युवकांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा युवक महोत्सवची गरज आहे. आजचा युवक हा केवळ नोकरी मागणारा न राहता त्याच्यामध्ये असणाऱ्या कलागुणांच्या माध्यमातून यशाच्या शिखरावर पोहोचू शकतो, त्यासाठी युवक महोत्सव हे एक चांगले माध्यम आहे. आजचा युवक हा देशाच्या परिवर्तनाचा केंद्रबिंदू असून, त्याने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता त्याच्यामधे असणाऱ्या कलांच्या माध्यमातून आपला विकास करण्याचा प्रयत्न करावा आजच्या या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ बक्षीसाचा विचार न करता विविध कला प्रकारांचा आनंद घ्यावा असे मत माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवक महोत्सव 'जल्लोष २०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. सविता कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. संदीप पालवे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, स.ब. वि.प्र.समाज संस्थेचे संचालक, प्रा. बाबा खरात, डॉ. प्रताप फलफले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, प्रा. जयराम डेरे, डॉ. लक्ष्मण घायवट, प्रा. नानासाहेब गुंजाळ, महाविद्यालय प्रशासन अधिकारी, श्री. गोरक्षनाथ पानसरे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पालवे म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नेहमीच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देते.

या कार्यक्रमाचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बाळासाहेब वाघ यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. जयराम डेरे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रामदास अहिराणी केले तर प्रा. नानासाहेब गुंजाळ यांनी आभार मानले. या उद्घाटन प्रसंगी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १२०० विध्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## जिवंत आहे तोपर्यंत चांगली किर्ती करत रहा : हभप. आडभाई महाराज



**चांदा** : जिवंत आहे तोपर्यंत माणसाने चांगली किर्ती केली पाहिजे मृत्यू नंतर त्यांचे नाव अजरामर राहिले पाहिजे असे रामायणाचार्य ह. भ. प. देविदास महाराज आडभाई यांनी चांदा येथील सुदाम जावळे यांच्या वस्तीवर किर्तन रुपी सेवेतून बोलताना व्यक्त केले. ते पुढे कीर्तन रुपी सेवेतून बोलताना म्हणाले की या देहाचा सुगंध दरवळला पाहिजे असे कर्म करा साडेसातशे वर्षे झालेत तरी देखील ज्ञानोबारायांचा सुगंध आजही दरवळत आहे साडेतीनशे वर्ष झाले संत तुकोबारायांचा सुगंध आजही जसाचा तसाचआहे चारशे वर्षे झाली नाथबाबांचा सुगंध आजही जशाच्या तसा दरवळत आहे म्हणून चांगले कर्म करीत रहा भगवंताचे नाम स्मरण करीत रहा आपल्याला समाज किती दिवस ध्यानात ठेवतो म्हणून आपण चांगले कर्म कले पाहिजे तरच आपली किर्ती मागे राहिल, असे ते किर्तन रुपी सेवेतून उपस्थित भाविकांना सांगत होते. प्रत्येक संतांच्या अंतकरणांमध्ये समाजहिताचा कळवळा आहे दुसरे काही नाही हे लक्षात ठेवले पाहिजे असे ते या वेळी म्हणाले. या वेळी कारभारी महाराज झरेकर यांनी असे सांगितले की आता श्रद्धांजली वाहण्यापेक्षा पसायदानाला महत्व द्या कारण पसायदानाला जे जगात महत्त्व आहे ते तुमच्या श्रद्धांजली वाहण्याला नाही त्यामुळे येथून पुढे श्रद्धांजलीच्या भाषनापेक्षा पसयदान हेच श्रद्धांजली समजून पसयदानाला महत्व द्या असे त्यांनी आवर्जून सांगितले.

## राष्ट्रीय मानवाधिकार हक्क संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सचिन निकम



**शिर्डी** : गेले अनेक वर्षांपासून शाहू, फुले, आंबेडकर चळवळीमध्ये निष्ठेने काम करणारे रा हाता तालुक्यातील निमगाव कोर्हाळे येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन भीमा निकम यांची राष्ट्रीय मानवाधिकार हक्क संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र लिंगाडे यांच्याकडून नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे. सचिन निकम हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक न्याय, मानवाधिकार आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत आहेत. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेचा वारसा पुढे नेत त्यांनी तालुक्यासह जिल्हाभरात चळवळीचे कार्य विस्तारले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल अहिल्यानगर जिल्हाभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून सर्व स्तरांतून त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे. यावेळी प्रतिक्रिया देताना सचिन निकम म्हणाले की संघटनेचे कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी तन, मन, धनाने कार्य करीन आणि संघटनेचा लौकिक वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## पिंप्री लौकीत दुष्काळी पंचनामे करण्यास सुरुवात !



**आश्वी** : संगमनेर तालुक्याच्या पूर्व भागातील पिंप्री लौकी - अजमपुर गावातील शेतकऱ्यांचे दुष्काळी परिस्थितीमध्ये जळालेले पिकांचे पंचनामे करण्यात येत आहे. या गावचे सामाजिक कार्यकर्ते जिल्हा भाजपाचे सरचिटणीस भारतराव गिते यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार तलाठी वाळके आप्पा कृषी अधिकारी श्री गायकवाड ग्रामसेवक इले तलाठी कार्यलयाचे अहिलाजी गिते संतोष दातीर यांनी आज बुधवार रोजी सुरु केले. सध्या या भागात भीषण पाण्याचा प्रश्न जाणवत असताना उभी पिके बाजरी सोयाबीन कांदा, तुर, मका जळुन खाक झाले. त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक सापडला आहे. शेती मध्ये झालेला खर्च वाया गेला तर मजुर मिळत नसल्यामुळे शेतकरी हैरान झाले आहे. मजुरी खते औषधांच्या किंमती भरमसाट वाढल्यामुळे शेतीचे नियोजन कोलमडले आहे त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचीत सापडाला आहे त्यामुळे शाशनाने एकरी ५० हजार रु भरपाई घावी अशी मागणी शेतकरी वर्ग करित आहे.

# दुष्काळात बाजार समितीने नफ्यातून शेतकऱ्यांसाठी उपक्रम राबवावेत

## सर्वांनी एकत्र येऊन धान्य बँक सुरू करा : बिपीनदादा कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने नफ्यातील २५ लाख रुपये बी-बियाणे, दुग्ध व्यवसायाला मदत यांसारख्या उपक्रमांसाठी खर्च करावेत. तसेच सक्षम शेतकरी व समाजातील दानशूर व्यक्तींनी एकत्र येऊन धान्य बँक सुरू करावी, अशी सूचना संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केली.

कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा बिपीनदादा कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. सभापती साहेबराव रोहोम यांनी बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाच्या कार्यकाळातील कामकाज व आर्थिक प्रगतीची माहिती दिली. यावेळी कोल्हे म्हणाले, राज्यात १९७२ प्रमाणे दुष्काळाच्या झळा जाणवत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे आवश्यक आहे. 'शेतकरी टिकला तर देश टिकेल', त्यामुळे वर्षभर शेतकऱ्यांची साथ घेणाऱ्या शहरांनीही संकटाच्या काळात त्यांना साथ द्यावी. कोपरगाव तालुक्यात खरिपापेक्षा रब्बीचे क्षेत्र अधिक आहे. जमिनीच्या विभाजनामुळे अनेक कुटुंबे अल्पभूधारक झाली असून बांधावरून वाद व न्यायालयीन लढाया वाढत आहेत. नवीन पिढीला आपण काय देणार, याचा विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



नगर-मनमाड मार्गावर बाजार समिती परिसरात उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे तसेच चाऱ्याच्या लिलावामुळे अपघात होण्याचा धोका असल्याच्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणीवरही सकारात्मक कार्यवाही करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, प्रगतशील शेतकरी बबनराव निकम यांनी बाजार समितीला माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे नाव देण्याचा ठराव मांडला.

नव्याने होणाऱ्या शेतकरी भवनाला त्यांचे नाव देण्याची मागणीही करण्यात आली. या ठरावास पांडुरंग शिंदे, संदीप देवकर, विक्रम पाचोरे व दीपक चौधरी यांनी अनुमोदन दिले. बंधारे दुरुस्तीसाठी आमदार विवेक कोल्हे यांनी ७ कोटी २९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आभार मानले. बाजार समितीचे संचालक, पदाधिकारी, शेतकरी, व्यापारी व मान्यवर उपस्थित होते.

## हिवरगाव पावसा येथे नुकसानग्रस्त भागाची थोरातांकडून पाहणी

### शेतकऱ्यांना पंचनाम्याची अट न ठेवता तातडीने भरघोस मदत द्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : हिवरगाव पावसा येथे अचानक झालेल्या पावसामुळे शेतपिकांसह शेडनेट, घरे, पत्रे व कौले यांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानग्रस्त भागाची काँग्रेस नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पाहणी करून शेतकरी व नागरिकांना दिलासा दिला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्याची अट न ठेवता तातडीने भरघोस मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या विविध पिकांचे नुकसान झाले असून शेडनेटचे कागद, घरांची पत्रे व कौलेही वाऱ्यासह पावसामुळे खराब झाली आहेत. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर या नुकसानीमुळे नवीन संकट उभे राहिले आहे. यावेळी थोरात म्हणाले, यंदा राज्यात १९७२ पेक्षाही गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शासनाने आतापासूनच तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात पशुधन असल्याने त्यांच्यासाठी



पाणी व चाऱ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. पावसाअभावी अनेक भागांतील पिके वाया गेली असून काही ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्याही केल्या आहेत, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंचनाम्याची प्रक्रिया न करता तातडीने मदत द्यावी.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट एकरी भरघोस मदत देण्याबरोबरच राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून मोठी आर्थिक मदत करावी, अशी मागणीही थोरात यांनी केली. यावेळी डॉ. प्रमोद पावशे, डॉ. संदीप पावशे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## पायरेन्स आयबीएमएच्या चार विद्यार्थिनींना नोकरीची संधी






**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : पायरेन्स इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन (आयबीएमए), लोणी येथे एक्सेलआर कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑनलाइन रोजगार निवड प्रक्रियेत संस्कृती शेलार, निशा नानावरे, प्रतीक्षा पुलाटे आणि भावना मालुसरे या चार विद्यार्थिनींची फुलस्टॅक डेव्हलपर पदासाठी निवड झाली. प्रत्येक विद्यार्थिनीला तीन लाख रुपये वार्षिक पॅकेज मिळाले आहे. जावा तंत्रज्ञानावर आधारित या पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत बौद्धिक क्षमता चाचणी, समूह चर्चा आणि वैयक्तिक मुलाखतीद्वारे विद्यार्थिनींचे तांत्रिक ज्ञान, तर्कशक्ती, संवादकौशल्य आणि समस्या सोडविण्याची क्षमता तपासण्यात आली. विद्यार्थिनींनी विविध टप्प्यांत उल्लेखनीय कामगिरी करत नोकरीची संधी मिळविली.

आम्ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आम्हाला संस्थेच्या माध्यमातून विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या मंत्री ना. विखे पाटील संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, सचिव डॉ. निलेश बनकर यांनी दिलेलं प्रोत्साहन यामुळे आम्हाला आमची स्वप्न पूर्ण करता आली याचा मोठा आनंद आहे.

**प्रतिक्षा पुलाटे**

## राहुरीत रोजगार महाकुंभाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### १२ कंपन्यांचा सहभाग; १५९ उमेदवारांची प्राथमिक निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, अहिल्यानगर आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाइन पद्धतीने केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध नामांकित कंपन्या व आस्थापनांनी मेळाव्यात सहभाग घेत युवक-युवतींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. विविध शैक्षणिक पात्रता व कौशल्यांनुसार उपलब्ध पदांची माहिती उमेदवारांना देण्यात आली. तसेच संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया राबविली.

राहुरी महाविद्यालयात आयोजित या रोजगार महाकुंभात ३५५ युवक व ४९ युवती, अशा एकूण ४०४ उमेदवारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. १२ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी १५९ उमेदवारांची विविध पदांसाठी प्राथमिक निवड केली. त्यामुळे परिसरातील बेरोजगार युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये व आवडीनुसार रोजगाराच्या संधी मिळण्यास मदत झाली.

कार्यक्रमास तहसीलदार डॉ. अमित पवार, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जनरल सेक्रेटरी हर्षदादा तनपुरे, मुख्याधिकारी विद्या पाटील, जिल्हा निरीक्षक समितीचे मिलिंद ऋषी, शासकीय आयटीआयचे प्राचार्य मधुकर मराठे, प्राचार्य चेतन गाढवे, प्राचार्य डॉ. नवनाथ दळवी आदी उपस्थित होते. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी अधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत शिवम लेकुरवाळेला सुवर्ण, गणेश धाडंबेला रौप्य



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : सद्गुरु कृषी महाविद्यालय, मिरजगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन कुस्ती व शरीरसौष्ठव स्पर्धेत कॉलेज ऑफ ग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षात शिकत असलेला विद्यार्थी शिवम लेकुरवाळे याने ५७ किलो वजनी गटातील कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. या यशामुळे त्याची ऑल इंडिया आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच याच स्पर्धेतील शरीरसौष्ठव (Best Physique) गटात गणेश धाडंबे याने रौप्य पदक मिळवले आहे.

### दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे

या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील आणि भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांच्यासह महाविद्यालय, प्राचार्य , प्राध्यापक व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे शिर्डी, ता. राहाता येथील बिनशेती मिळकत सर्वे न. ३/२३ पैकी, याचा सिटी सर्वे न. ९०८ पैकी, (जुना मिळकत न.ए१०००४८४ नवीन मिळकत न. एसएचआयआर००००४१७८) जे.टी.शेळके पाटील मार्ग शिर्डी, पिंपळवाडीरोड, शिर्डी, ता. राहाता, जि.अ.नगर महाराष्ट्र ४२३१०९

वर नमूद मिळकती संदर्भात दुय्यम निबंधक, राहाता येथे नोंदविलेला मुळ दस्त क्र. १३४८/२००४ दि. ११/०५/२००४ हा दस्त मुळ मालक राजेंद्र जयराम शेळके, रा. पिंपळवाडी रोड, शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर यांचेकडून गहाळ झालेला असून, शोध घेतला असता आजपर्यंत मिळून आला नाही. तसेच मुळ मालक राजेंद्र जयराम शेळके यांनी शिर्डी पोलीस स्टेशन, ता. राहाता यांचेकडे वरील दस्त गहाळ झालेबाबत अर्ज दिलेवरुन शिर्डी पोलीस स्टेशन यांनी तसा दाखला दि.२९/०९/२०२६ रोजी गहाळ रजिस्टर नं. ८६४/२०२६ अन्वये दिलेला आहे. सदर दस्ताबाबत खरेदीखत, साठेखत, अदलाबदलपत्र, तारण, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, ट्रस्ट, वारस, कौटुंबिक व्यवस्था, इच्छापत्र, भागीदारी, लिज, लायसेन्स, बोजा भाडेपट्टा, न्यायालयीन दावा अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधीतांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर हरकत नोंदवावी.

तारीख-२९/०९/२०२६

राजेंद्र जयराम शेळके रा. पिंपळवाडी रोड, शिर्डी, ता. राहाता, जि.अ.नगर मो.न. ९९२२७७७९९५

**ॲडव्होकेट श्री. सी.एन. चौधरी**
**ऑफिस-पिंपळस रोड, राहाता पोलीस स्टेशन जवळ राहाता, ता. राहाता, जि. अ.नगर मो.नं. ९९७५८८६०८८**

### जाहीर नोटीस

ॲड. एस ए हासे
अकोले कोर्ट. नं २

अकोले येथील दिवाणी न्यायालय, क. स्तर, अकोले जि. अ.नगर यांचे न्यायालयात......

दिवाणी चौ अर्ज. १२/२०२५

निशाणी क. ०८

पु.ने.ला. ०६/११/२०२६.

१. शांताराम दगडु उपे, वय ५३ रा. घर नं. २६९, उपे चाळ, ताडवाडी, अंबरनाथ ठाणे महाराष्ट्र ४२१ ५०१-**अर्जदार**

विरुध्द

कोणीही नाही-**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क. १२/२०२५ दाखल केला आहे. अर्जदार याची आजी सखुबाई सखाराम रूद्रे या मयत झाले आहेत. मयत सखुबाई सखाराम रूद्रे यांचे पती सखाराम रूद्रे हे देखील मयत झालेले आहेत. सखुबाई सखाराम रूद्रे यांना शांताबाई उर्फ शांता ही एकमेव मुलगी हयात वारस होती. शांताबाई हिचे लग्न दगडु उपे यांच्याशी होवून त्यांना अर्जदार शांताराम हा एकमेव मुलगा हयात वारस आहे. शांताबाई व दगडु हे दोघेही मयत आहेत. त्या अनुशंगाने अर्जदार यांने ग्रामपंचायत गर्दणी येथील मालमत्ता क. २२०/ग मिळकती करीता वारस म्हणुन अर्जदार नं. १ यांची नोंद करणेकरीता संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांचेकडे अर्ज केला असता त्यांनी अर्जदार यांचेकडे हेअरशिप सर्टिफिकेट ची मागणी केली.

तरी सदर अर्जदार हा मयत सखुबाई सखाराम रूद्रे यांचे कायदेशिर वारसदार आहेत, व तसे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी अर्जदार हे वर मयत असलेल्यांचे कायदेशीर वारस नाहीत, त्यांचेशिवाय दुसरे कोणी वारसदार आहे, असे कोणाचे म्हणणे असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी या न्यायालयात नेमलेली तारीख ०६.११.२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अथवा सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आपण स्वतः अगर कायदेशीर वकीलामार्फत या अर्जात हजर होवून लेखी हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचेही काही एक म्हणणे नाही असे समजून मे. कोर्ट अर्जदाराचा पुरावा ऐकुन घेवुन कायदयाप्रमाणे पुढील योग्य तो आदेश पारीत करतील. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १७/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

| | | |
|---|---|---|
| **कामगिरी क्लर्क**<br>**एस. के. खामकर**<br>**क. लिपीक** | शिक्का | **हुकूमावरुन,**<br>**सहा. अधिक्षक**<br>**दिवाणी न्यायालय क. स्तर, अकोले** |

# राज्यस्तरीय जवाहरलाल नेहरू हॉकी कप स्पर्धेचा उत्साहात समारोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर व गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर यांच्या संयुक्त विद्यमाने गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य हॉकी क्रीडांगणावर दि.२७ ते ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या शालेय राज्यस्तरीय जवाहरलाल नेहरू हॉकी कप क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चा बक्षीस वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन दिनार कुदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बक्षीस वितरण समारंभात १५ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या गटातील विजेत्या, उपविजेत्या आणि तृतीय क्रमांक प्राप्त संघांना चषक प्रदान करून गौरविण्यात आले.या तीन दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतील उत्कृष्ट हॉकी संघांनी सहभाग नोंदविला.१५ वर्षांखालील गटात आठ विभाग, तर १७ वर्षांखालील गटात नऊ विभाग सहभागी झाले होते. त्यामुळे गौतम पब्लिक स्कूलचे हॉकी मैदान तीन दिवस हॉकीच्या रोमांचक सामन्यांनी गजबजून गेले होते.

१७ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात फलटण-कोल्हापूर विभागाच्या संघाने ३-० असा विजय मिळवत विजेतेपद पटकावले. तर प्रवरा कन्या विद्यालय, लोणी, पुणे विभाग हा संघ उपविजेता ठरला. मुंबई विभागाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.१७ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात क्रीडा प्रबोधिनी, संभाजीनगर या संघाने पेनल्टी स्ट्रोकमध्ये विजय मिळवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.



जी. एन. खालसा कॉलेज, मुंबई हा संघ उपविजेता ठरला, तर डी.सी.नरके विद्यालय, कोल्हापूर विभाग या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.१५ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात डॉन बॉस्को हायस्कूल, मुंबई संघाने पेनल्टी स्ट्रोकमध्ये २-० असा विजय मिळवत विजेतेपद पटकावले. गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर, पुणे विभाग हा संघ उपविजेता ठरला.

तर खालसा हायस्कूल नांदेड लातूर विभाग या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.यावेळी विविध संघांचे क्रीडा प्रशिक्षक, खेळाडू आणि आयोजक यांचा सन्मान करण्यात आला. तीन दिवसांच्या स्पर्धेत उत्कृष्ट क्रीडाशिस्त, संघभावना आणि कौशल्याचे दर्शन घडविणाऱ्या खेळाडूंचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

या समारंभास क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, भगवान पवार, प्रवीण कोंडावळे, कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे निरीक्षक नारायणराव बारे, गौतम पब्लिक स्कूलचे प्राचार्य नूर शेख, गौतम पॉलिटेक्निकचे प्राचार्य वसीम शेख, सौ.सुशीलामाई काळे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. गुरसळ मॅडम, संघांचे प्रशिक्षक, स्पर्धेचे आयोजक,पालक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सर्व विजेत्या व सहभागी खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक, पंच, आयोजक आणि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.

राज्यस्तरीय जवाहरलाल नेहरू हॉकी कप स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी कोपरगाव तालुका क्रीडा समिती उपाध्यक्ष व गौतमचेक्रीडा विभाग प्रमुख रमेश पटारे, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद, महेश गोंडे, दानिश शेख, अविनाश कोळपे, कु. सार्थक पटारे, कु. गौरी बारवकर, हाऊस मास्टर प्रकाश भुजबळ, नसिर पठाण, आबासाहेब जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.तसेच शाळेचे दोन्ही विभागांचे पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत मोलाचे सहकार्य केले. गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य आणि प्रशस्त हॉकी मैदानावर सलग तीन दिवस झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे गौतमनगरच्या क्रीडांगणावर राज्यभरातील हॉकीपटूंचा जल्लोष पाहायला मिळाला. उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि दर्जेदार क्रीडा सुविधांमुळे स्पर्धेचा समारोपही उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रेखा जाधव यांनी केले.

## पान १ वरुन

## चांद्यामध्ये बेकायदेशीर दारूचा साठा पकडला

रंगाच्या मारुती ब्रीजा गाडी मधून विक्रीसाठी आणून ठेवण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकून मारुती ब्रीझा कार (क्र. एम. एच.१२ एन यु ९१ ७७ ) हिची झडती घेतली असता त्यामध्ये ५६ हजार १६० रुपये किमतीची दारू त्यात रॉयल टॅग, इंपिरियल ब्ल्यू नावाच्या दारूच्या बाटल्या आणि १० लाख रुपये किमतीची एक ब्रिजा कार असा एकूण १० लाख ८८ हजार ८०० रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला.
जप्त केलेल्या मालाबाबत संभाजी गायकवाड यांच्याकडे चौकशी केली असता त्याने हा साठा प्रवीण नानासाहेब घाडगे, राजेंद्र बाबुराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली. याप्रकरणी चौघां विरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सोनई पोलीस करत आहे.

## शिर्डीत पोलिसांची मोठी कारवाई

उद्देशाने पळून गेले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता ते मिळून आले नाहीत. त्यानंतर घटनास्थळाची दोन पंचांसमोर पाहणी केली असता, त्या ठिकाणी एक बॅग मिळून आली. या बॅगेची पाहणी केली असता त्यात १८ लाख ३४ हजार रुपये किमतीचे, नामांकित कंपनीचे एकूण ५५ मोबाईल जप्त करण्यात आले. गुन्हा दाखल व पुढील तपास:
या प्रकरणी मिळालेल्या मुददेमालाचा पंचनामा करून पळून गेलेल्या आरोपींविरोधात शिर्डी पोलीस स्टेशन येथे गुरनं ८६१/२०२६ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२, १२४ प्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ३ वाजून १८ मिनिटांनी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.
सदरची ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, सपोनि कल्पेश कुमार चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सागर काळे, महादेव गुट्टे, प्रदिप बोहाडे, मपोउपनि आकांशा जाधव यांच्यासह पोलीस पथकातील अंमलदार आणि पोलीस मित्र योगेश शिंदे यांनी संयुक्तरीत्या केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार / १४३२ लांडे हे करीत आहेत.

## वरिष्ठाच्या त्रासाला कंटाळून लष्करी जवानाची आत्महत्या

घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी ठोंबरे यांच्या पत्नी लक्ष्मी अप्पाराव ठोंबरे यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी नायब सुभेदार निलकमल आणि हवालदार सचिन खेडकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख करत आहेत.

## कळसूत्री बाहुल्यांचे मोदी-शाह सूत्रधार

झारखंड मुक्ती मोर्चासह २० पक्ष सहभागी झाले. काँग्रेस नेते जयराम रमेश यांच्या माहितीनुसार, या पक्षांकडे लोकसभेत १७८ आणि राज्यसभेत ६२ खासदार आहेत. आम आदमी पक्ष, तमिळगा वेत्री कळगम आणि द्रमुक बैठकीला उपस्थित नव्हते.
राहुल गांधी यांनीही निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत लोकशाहीसाठी विरोधक एकत्रितपणे लढणार असल्याचे सांगितले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही निवडणूक प्रक्रियेबाबत गंभीर आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी केली.

# कुलूप लावाल तर गावकरीच उघडतील

## ग्रामपंचायत खाजगी मालमत्ता नाही : खंडागळे, साळवी, नवले यांचा विरोधकांना टोला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** ग्रामपंचायत ही संपूर्ण गावकऱ्यांची संस्था असून, ती कोणाचीही खासगी मालमत्ता नाही. ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावण्याचा इशारा देणाऱ्यांनी कुलूप लावावे; मात्र गावकरी मंडळ जनतेला सोबत घेऊन ते कुलूप उघडेल, असा इशारा माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, माजी सरपंच मीना साळवी आणि माजी उपसरपंच चंद्रकांत नवले यांनी दिला.
ग्रामपंचायत कार्यालयात सत्ताधारी गटाकडून हस्तक्षेप होत असल्याच्या आरोपांना उत्तर देताना त्यांनी सांगितले की, बेलापूर बु.-ऐनतपूर हे मोठे गाव असून ग्रामस्थांच्या अनेक दैनंदिन समस्या आहेत. सध्या तीव्र दुष्काळामुळे पाणीप्रश्न गंभीर आहे. ग्रामस्थ विश्वासाने आपल्या समस्या घेऊन येत असल्याने लोकसेवक म्हणून त्या प्रशासक व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून सोडवून घेण्याचे काम केले जाते. याचा अर्थ ग्रामपंचायतीचा कारभार करणे असा होत नाही.
प्रशासकांकडे तीन ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्याने ते आठवड्यातून एक-दोन दिवस उपलब्ध असतात. त्यामुळे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही ग्रामपंचायतीत उपस्थित राहतो. याला राजकीय रंग देणे हा खोडसाळपणा असल्याची टीका त्यांनी केली.
'निवडणुका जवळ आल्याने विरोधकांना जाग आली आहे. पाच वर्षे ते कुठे होते, याचे उत्तर जनतेला द्यावे. कुलूप लावण्यापेक्षा गावासाठी विकासनिधी आणण्यासाठी राजकीय ताकद वापरावी. सणासुदीच्या काळात कुलूप लावल्यास जनता आगामी निवडणुकीत त्यांच्या राजकीय दुकानाला कुलूप लावेल,' असा टोलाही खंडागळे, साळवी व नवले यांनी लगावला.

# निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप, राजीनाम्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत, त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी वैजापूर युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबत बुधवारी तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी गाढवावर ज्ञानेश कुमार यांचे छायाचित्र लावून शहरात अनोखी दिंडी काढत तीव्र संताप व्यक्त केला. निवेदनात म्हटले आहे की, अलीकडील निवडणुकांमध्ये मतदारांच्या हक्कांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मतदार याद्यांमधील फेरबदल व नावे वगळण्याबाबत विविध स्तरांतून आक्षेप नोंदवले गेले आहेत.आयोगाच्या अंतर्गत निर्णय प्रक्रियेबाबतही वाद निर्माण झाला असून, दोन आयुक्तांनी निर्णयांवर आक्षेप घेतल्याचे वृत्त होते. मात्र,आयोगाने सर्व निर्णय सर्वानुमते झाल्याचे स्पष्ट केले आहे. निवडणूक आयोगावर राजकीय दबाव असल्याने सामान्य नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला



आहे. ज्ञानेश कुमार यांना पदावरून तात्काळ मुक्त न केल्यास युवक काँग्रेसच्या वतीने आणखी तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा यावेळी देण्यात आला. निवेदनावर जिल्हाध्यक्ष विश्वास औताडे,तालुकाध्यक्ष राहुल संत,शहराध्यक्ष डॉ.मुकेश शाह,शक्यसिंह त्रिभुवन,साहेबराव पडवळ,प्रवीण खाजेकर,सागर निपटे,श्रीराम तांगडे,अजय दिंडोरे,राजू शेख आदींचे स्वाक्षरी आहे.

# पालकमंत्र्यांचा सभेत पाकीट मारणाऱ्या भामट्याला रंगेहाथ पकडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राहुरी येथील आढावा बैठकीत गर्दीचा फायदा घेऊन एका भामट्याने उत्तम वाघ यांच्या खिशातील रोख रक्कम काढून घेतली. तेव्हा भामट्याला रंगेहात पकडुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.
पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाणी टंचाई आढावा बैठकीचे दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी राहुरी शहरातील पांडुरंग लॉन्स मंगल कार्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी उत्तम वाघ हे त्यांच्या काही मित्रां सोबत आले होते. सायंकाळी ६.१५ वाजे दरम्यान बैठक संपल्यानंतर उत्तम वाघ हे कार्यालयातून बाहेर जात होते. त्यावेळी एका भामट्याने गर्दीचा फायदा घेऊन उत्तम वाघ यांच्या पॅन्टच्या खिशातील १९ हजार रुपये रोख रक्कम हातचलाखी करुन काढून घेतली. सदर प्रकार उत्तम वाघ यांच्या लक्षात आला. त्यांनी भामट्याला जागेवर रंगेहात पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेली रोख रक्कम हस्तगत केली.
उत्तम एकनाथ वाघ, वय ६१ वर्षे, रा. वाघाचा आखाडा, ता. राहुरी यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी सिराज आयुब शेख, वय २५ वर्षे, रा. वॉर्ड नं. दोन, श्रीरामपुर, याच्यावर गुन्हा रजि. नं. ११११/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# शरीरसौष्ठव स्पर्धेत बेल्हेकर शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयाचा झेंडा; यश गाडेकरला सुवर्णपदक !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील भानसहिवरा येथील सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी यश गाडेकरने मिरजगाव येथे झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेशराव बेल्हेकर व संचालिका डॉ. रंजनाताई बेल्हेकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्याने हे यश संपादन केले आहे.महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत सदगुरू कृषी महाविद्यालय, मिरजगाव येथे दि. २९ व ३० सप्टेंबर या कालावधीत कुस्ती, वजन उचलणे व शरीरसौष्ठव या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये भानसहिवरा येथील कृषी महाविद्यालयातील कु.यश रामराव



गाडेकर,कु.कुशल राम पवार व कु. संकेत संजय पटारे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये यश गाडेकर याने आपल्या उत्कृष्ट शारीरिक तंदुरुस्ती, मेहनत,आत्मविश्वास व दमदार सादरीकरणाच्या जोरावर शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले.त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत म. फु. कृ. वि., राहुरी विद्यापीठ संघामध्ये गाडेकर यांची निवड झाली आहे.
ही कामगिरी महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असून, त्याने महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.
या यशाबद्दल सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था यांच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेशराव बेल्हेकर,संचालिका डॉ. रंजनाताई बेल्हेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक बेल्हेकर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.इंगळे,श्री.वाघे सर,डॉ. हारदे, प्राचार्य अहिरे आणि प्राचार्य डॉ. प्रकाश तुर्बतमठ यांनी स्पर्धकांचे तसेच संघ व्यवस्थापक प्रा. भाऊसाहेब बेल्हेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थांतर्गत विविध महाविद्यालयांच्या प्राचार्य यांच्याकडून देखील कौतुक करण्यात आले.

# महिला शेतकरी प्रमाणपत्र योजना ग्रामीण भागासाठी उपयुक्त : डॉ. ढगे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेली महिला शेतकरी प्रमाणपत्र योजना ग्रामीण भागातील महिलांसाठी अत्यंत उपयुक्त असून, या योजनेचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी केले. नेवासा तालुक्यातील माळेवाडी खालसा येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने महिला शेतकरी प्रमाणपत्र योजनेबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती कीर्ती सूर्यवंशी यांनी गावातील वाड्या-वस्त्यांवर जाऊन महिलांना योजनेची सविस्तर माहिती




दिली. यावेळी मार्गदर्शन करताना सूर्यवंशी म्हणाल्या की, शासनाने 'शेती करणे' या संकल्पनेची व्याख्या अधिक व्यापक केली असून त्यामध्ये मत्स्यबीज निर्मिती, बियाणे उत्पादन व बीजप्रक्रिया, रेशीम उद्योग तसेच विविध शेतीपूरक व ग्रामीण व्यवसायांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेती व शेतीशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.
महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया समजावून सांगताना त्यांनी प्रथम अर्ज करणे, त्यानंतर आधार कार्ड व केवायसी नोंदणी करणे, आपण करीत असलेल्या शेतीविषयक व शेतीपूरक कामांची माहिती भरणे आणि अंतिम पडताळणी करून ॲपवर अर्ज सादर करणे, या चार टप्प्यांची माहिती महिलांना दिली. महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांना शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये अधिकृत ओळख मिळण्यास या उपक्रमाची मदत होणार आहे. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी दिगंबर लोखंडे, प्रगतशील शेतकरी सागर जाधव, दिनेश चांदगुडे, सचिन मुळे, सुनील मुळे तसेच महिला शेतकरी भारती चांदगुडे व वर्षा चांदगुडे उपस्थित होत्या. प्रवरा संगम परिसरात महिला शेतकरी प्रमाणपत्र योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत असल्याबद्दल डॉ. अशोकराव ढगे यांनी कृषी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

## निधन

### भानुदास तारू



**वडाळा महादेव :** शेवगाव येथील भानुदास शहाजी तारू वय ८० शेवगाव एस टी डेपोतील निवृत्त एस टी वाहक कर्मचारी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचे त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा १ मुलगी १ सुन नातंवडे जावई असा मोठा परीवार आहे. येथील एस टी महामंडळ विभागात कार्यरत वाहक शैलेन्द्र तारु व सुनिता टेकाळे यांचे ते वडील तर महाराष्ट्र पोलिस दलात कार्यरत असलेले पोलिस हवालदार किरण टेकाळे यांचे ते सासरे होत.

## सुधीर डागा यांची महाराष्ट्र रिटेलर्स फोरमच्या अध्यक्षपदी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** महाराष्ट्रातील व्यापारी, उद्योजक व शेतकऱ्यांची शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या महाराष्ट्र रिटेलर्स फोरमच्या अध्यक्षपदी कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष तथा बालाजी सुपर मार्केटचे संचालक सुधीर डागा यांची निवड झाली आहे. मुंबई येथे झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी ही निवड जाहीर केली. डागा गेल्या ३५ वर्षांपासून किराणा व्यवसायात कार्यरत असून, बदलत्या बाजारपेठेची गरज ओळखून पॅकिंग किराणा मालाची संकल्पना कोपरगावात त्यांनी राबविली. व्यवसायासोबतच व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. ऑनलाइन व्यापारातील वाढती स्पर्धा, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, वजन व किमतीतील तफावत आदी प्रश्नांवर त्यांनी 'एक देश-एक वजन-एक दर' ही संकल्पना शासनाकडे मांडली.
डागा म्हणाले, माझी दोन्ही मुले व्यवसायाची जबाबदारी सांभाळत असल्याने आता व्यापाऱ्यांची एकजूट मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांसाठी अधिक वेळ देता येणार आहे. दरम्यान, 'गाव तेथे उद्योजक' संकल्पनेअंतर्गत जानेवारीत शिर्डी येथे राज्यव्यापी अधिवेशन व उद्योगपती मेळावा होणार असून, त्याच्या तयारीसाठी डागा महाराष्ट्रभर दौरा करणार आहेत. या निवडीबद्दल काका कोयटे, राजकुमार बंब, तुलसीदास खुबानी, अजित लोहाडे, प्रदीप साखरे आदींनी डागा यांचे अभिनंदन केले.

# कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात

## आदर्श विद्यार्थी, स्पर्धा विजेते व देणगीदारांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :**
रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ (कला) महाविद्यालय, कोल्हार बु. येथे बुधवारी (दि. ३०) उत्साहात जयंती सोहळा झाला. यावेळी आदर्श विद्यार्थी, विविध स्पर्धांतील विजेते तसेच विद्यालयाला योगदान देणाऱ्या देणगीदारांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रावसाहेब नाथाजी म्हस्के पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. संदीप वर्पे पाटील, नवनियुक्त जनरल



बॉडी सदस्य किरण कडू पाटील, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील, उद्योजक प्रशांत कुहिले पाटील, डॉ. शशिकांत काळे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक अंकुशराज जामदार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ज्येष्ठ शिक्षक शब्बीर शेख यांनी देणगीदार तसेच स्व. माधवराव खर्डे पाटील स्मृती स्पर्धेतील विजेत्यांची नावे जाहीर केली. इयत्ता दहावी 'ड'मधील भक्ती संतोष राकेचा व सिद्धांत सतीश होले यांची आदर्श विद्यार्थी म्हणून निवड करून गौरव करण्यात आला.
विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी पाच लाख रुपयांची देणगी देणारे माजी विद्यार्थी उद्योजक प्रशांत कुहिले पाटील यांचा सत्कार करण्यात आला. नवीन इमारतीसाठी दोन ते अडीच कोटी रुपयांची आवश्यकता असून, शिक्षकांनीही सुमारे चार लाख रुपयांचे योगदान दिल्याचे ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी सांगितले.
ॲड. संदीप वर्पे पाटील यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत आधुनिक कौशल्ये आत्मसात करून विविध क्षेत्रांत यश मिळवावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात रावसाहेब म्हस्के पाटील यांनी माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विद्यालयाच्या विकासासाठी निधी उभारण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, सेवकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संग्राम गोपाळे, शब्बीर शेख व दीपक मगर यांनी केले. आभार सीताराम बोरुडे यांनी मानले.

CHANGE OF NANE
I HAVE CHANGE MY OLD NAME- PATHAN SHERKHAN ALIARKHAN (SCHOOL LEAVING CERTIFICATE) TO NEW NAME AS- SHERKHAN ALIYARKHAN PATHAN
(AADHAR NO. 811321816535)
DATE :- 01/10/2026

# नोकरी मेळाव्याचा युवकांनी लाभ घ्यावा : खा.भाऊसाहेब वाकचौरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी शिर्डी येथील जंगले महाराज आश्रमात दि.९ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या नोकरी मेळाव्याचा नेवासा तालुक्यातील बेरोजगार युवकांनी लाभ घ्यावा असे आवाहन नोकरी मेळाव्याचे आयोजक शिर्डी लोकसभा मतदार संघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना केले आहे.
नेवासाफाटा ते नेवासा रस्त्यावर आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात खा. वाकचौरे यांच्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेला नेवासा तालुक्याचे महायुतीचे आ. विठ्ठलराव लंघे पाटील, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख नितीन औताडे पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, खासदार कार्यालयाचे प्रमुख मुकुंद शिनगर, नेवासा नगरीचे महायुतीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली पेचे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुश काळे, राजेंद्र मते, भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापराव चिंधे, शिवसेनेचे नितीन जगताप, अंबादास लष्करे यावेळी उपस्थित होते.
यावेळी बोलतांना खासदार भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले की माझ्या शिर्डी लोकसभा मतदार संघातील बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे म्हणून शिर्डी येथे आनंद नोकरी मेळाव्याचे आयोजन युवा हब मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे या नोकरी मेळाव्यात



येणाऱ्या युवकांना कोणतीही रजिस्ट्रेशन फी भरावी लागणार नाही, कोणताही खर्च येणार नाही,त्यांनी फक्त मुलाखतीसाठी शिर्डीला तयारीनिशी यायचे आहे.
अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, सिन्नर तसेच परिसरातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या या नोकरी मेळाव्यात सहभागी होणार असल्याचे खा. वाकचौरे यांनी सांगितले.
या नोकरी मेळाव्यात ऑटोमोबाईल, बँकिंग, आय टी,फायनान्स,फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, इंजिनिअरिंग, लॉजिस्टिक्स,रिटेल,सेल्स मार्केटिंग, बीपीओ/आयटीईएस हेल्थकेअर,हॉस्पिटॅलिटी आणि इतर विविध क्षेत्रातील कंपन्याच्या संधी कोर्स व डिग्री घेतलेल्या युवकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
आ. लंघे पाटील म्हणाले, सर्वसामान्य जनता व उपेक्षित घटक केंद्रबिंदू मानून मी काम करत आलेलो आहे,त्यात खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेबांची खंबीर साथ माझ्या पाठीशी असल्याने तालुक्याच्या उत्कर्षासाठी आम्ही काम करणार आहोत.
त्यांनी आयोजित केलेला आनंद नोकरी मेळावा ही बेरोजगार युवकांसाठी पर्वणी असून नेवासा तालुक्यातील जास्तीत जास्त सुशिक्षित तरुणांनी या नोकरी मेळाव्याचा नक्कीच फायदा होणार असल्याने लाभ घ्यावा असे आवाहन केले.
नेवासा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य नियोजन करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पस्ट करत त्यादृष्टीने यंत्रणा तत्पर करण्यात आली असल्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी सांगितले.यावेळी खासदार वाकचौरे यांचे स्वीय सहायक आकाश गायकवाड,आमदार विठ्ठलराव लंघे यांचे स्वीय सहायक सुनील मोरे,विजय पवार उपस्थित होते

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. ०१ ऑक्टोबर २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

७ — १६० १७९ ११५ | ४ — १५८ २४८ २२० | २ — ३४५ ३९० ३३६

१७-७०-६४-४५-६२-२९

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

३ — १२० ३४६ ३३७ | ० — १९० २८० ४६० | १ — १४६ १२९ ११९

७३-३२-४०-०६-८१-१९

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

४ — १४९ २३९ ५९० | ६ — १६९ २६८ ६०० | ७ — १७९ २७८ ७००

१४-४३-२६-६८-०७-७९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# भीमसैनिकांचा संविधान सन्मान जनआक्रोश मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कर्जत :** सध्या देशात आणि राज्यात जाती-जातींमध्ये भांडणे लावायची आणि सत्ता भोगायची असा डाव खेळला जात असून आता आंबेडकरी विचारात देखील तो घुसण्याचा प्रयत्न सुरू आहे. अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या नावाखाली दोन्ही समुदायात तेढ निर्माण करण्याचा खेळ खेळला जात आहे. त्यामुळे या उपवर्गीकरणास आमचा विरोध आहे. आणि तो कायम राहिल असे प्रतिपादन आनंदराज आंबेडकर यांनी केले. ते कर्जत येथे उपवर्गीकरण विरोधी भव्य संविधान सन्मान जनआक्रोश मोर्चा व संविधान सन्मान सभेत बोलत होते. या जनआक्रोश मोर्च्यास मोठ्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते. अक्काबाईनगर येथून मोठ्या संख्येने भीमसैनिक एकत्र येत तहसील कार्यालयाच्या आवारात सभा पार पडली.

यावेळी पुढे बोलताना आनंदराज आंबेडकर म्हणाले की, संविधानात सर्वांना सोबत घेत त्यांचे नैतिक अधिकार जपण्याचे हक्क देत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायम सर्वसमावेशक भूमिका घेतली आहे. आज केवळ राजकीय स्वार्थासाठी यात छेडछाड करण्याचा कुटील डाव होत आहे. आणि यात आपलेच समाजबांधव बळी पडत असल्याचे दुर्दैव वाटते. एकी तुटली तर याचे परिणाम भविष्यात सर्व समाजबांधवांना भोगावे लागेल याचे भान जपणे आवश्यक आहे. हा जनआक्रोश मोर्चा आणि संविधान सन्मान सभा घेण्याचा मुख्य उद्देश असून यातून समाज जागृत होणे आवश्यक आहे.

अमन आंबेडकर म्हणाले की, आम्ही बाबासाहेबांच्या औलादी आहोत. आम्ही कोणालाच घाबरत नाही. त्यामुळे सरकारने संविधानास हात लावू नये. आज राजकीय स्वार्थासाठी जाती-जातींमध्ये भांडण्याचा लावण्याचा निंदनीय प्रकार सुरू आहे. त्यामुळे आंदोलनासाठी एकत्र आलोय असेच एकत्र राहूया आणि संविधान बदलणाऱ्याना सत्तेखाली खेचण्याची भूमिका पार पाडूया. यावेळी सिध्दार्थ शिनगारे, दादासाहेब शेळके, अमन आंबेडकर, खामगळ, परशुराम इंगोले या प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात भारताचं संविधानच सुप्रीम असून यास ना सरकार बदलू शकते. ना सुप्रीम कोर्ट. त्यामुळे उपवर्गीकरण करण्यास आमचा सक्त विरोध आहे. आणि यापुढे देखील राहणार. वास्तविक पाहता यात सरकारला काहीच द्यायचं नसून या आडून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची विचारांची एकजूट फोडून फक्त आपल्या जातीत भांडणे लावण्याचा डाव खेळला जात आहे. आज आरक्षणाला हात लागला तर उद्या अट्रोसिटीला देखील हात घातला जाईल. आणि मग संविधान बदलण्याचा घाट होईल. त्यामुळे हीच एकी दिल्लीला देखील दाखवावी लागेल असे आवाहन उपस्थित जनसमुदायास केले.

**चुकतंय तर टीका केलीच पाहिजे**

अनुसूचित जाती उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे संविधानाच्या मूळ आराखड्यास व सामाजिक ऐक्याला धोका पोहचत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना विचारात घेत आरक्षण दिले. यात कोणताही भेदभाव केला नाही. मग अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच कुटील डाव का ? असा सवाल जनआक्रोश सभेत उपस्थित करण्यात आला. सध्या आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र कोणी संविधानाचे तुकडे करणार असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. किती पण गुन्हे दाखल करा. हा भीमसैनिक असल्या भीकेस घाबरत नाही. कारण संविधानानेच कायद्यास जन्म दिला असल्याची तीव्र भावना भीमसैनिकांनी या आक्रोश मोर्च्यात मांडली.

## राशीनमध्ये भटके-विमुक्त हक्क व जात प्रमाणपत्र अभियान




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत राशीन सर्कलमध्ये भटके-विमुक्त हक्क व जात प्रमाणपत्र अभियान राबविण्यात आले. यावेळी भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना विविध शासकीय कागदपत्रे व सुविधांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अहिल्यानगर येथील विनोदकुमार लाड तसेच अनिलकुमार गायकवाड यांनी अभियानांतर्गत उपस्थित नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र आदी कागदपत्रांसंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच सेतू प्रतिनिधी वसीम सय्यद यांनी आधारकार्ड व जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि संबंधित कामकाजाबाबत माहिती दिली.

यावेळी राशीनचे सर्कल अधिकारी भाऊसाहेब राठोड, तलाठी तसेच पारधी, मराईवाला, कैकाडी यांसह विविध भटके-विमुक्त राजपूत समाजांचे नागरिक व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना अभियानाचा उद्देश व त्यातून मिळणाऱ्या सुविधांबाबत माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना आवश्यक कागदपत्रे मिळविण्यास तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यास मदत होईल. प्रशासनाने राबविलेल्या या चांगल्या उपक्रमाचे आम्ही नेहमीच स्वागत करतो, अशी अपेक्षा तात्यासाहेब माने यांनी व्यक्त केली. तसेच त्यांनी या उपक्रमासाठी प्रशासनाचे मनः पूर्वक आभार मानले.

**द•ख•ल**

## कोरडगा येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जंयती उत्साहात साजरी



**कोरडगाव :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कोरडगाव येथे मोठ्या उत्साहात व भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्था समन्वय समितीचे सदस्य मा.शिवशंकर दादा राजळे हे होते. अध्यक्षीय भाषणात बोलताना ते म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हा केवळ मंत्र दिला नाही, तर श्रम आणि शिक्षणाची सांगड घालून बहुजन समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहोचवले. त्यांच्या विचारांवर चालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पाथर्डी पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी मा. . सचिन संपत राख व रयत शिक्षण संस्था, सातारचे लाईफ वर्कर प्रा. सतिष शिर्के उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. बाबूजी आव्हाड महाविद्यालय येथील प्रा. ह.भ.प. सुभाष शेकडे सर यांनी कर्मवीरांच्या त्याग, निष्ठा आणि शैक्षणिक क्रांतीवर विचार मांडले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक चांडे तुकाराम जाणा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रसंगी स्थानिक स्कूल कमिटी, विद्यासमिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच कोरडगाव, मुखेकरवाडी, ओरंगपूर, कोळसांगवी, जिरेवाडी, सोनोशी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिराळ सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातीलशिराळ विविध कार्यकारी सेवा सोसायटीची सर्वसाधारण सभा दिनांक३०रोजी बुधवारी सकाळी दहा वाजता खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन सौ वर्षा मुळे,ह्या होत्या यावेळी,पाथर्डी कृषी उत्पन्न मार्केटकमिटीचे संचालक वैभव खलाटे,व्हॉइसचेअरमन गोरख भाऊ तागड, माजीचेअरमन रामदास गोरे,माजीचेअरमन हनुमंतराव घोरपडे,माजीचेअरमन संभाजी गोरे संचालक विजय कराळेगणेश गोरे,कुंडलिक गोरे,रावसाहेब कराळे,जयराम कराळे,जयराम तुपे,महादेव नावडे,शेख गुरुजी,पावशे गुरुजी,घोरपडे गुरुजी,ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अमोल घोरपडे,कारभारी घोरपडे,बाळू वाघ,भैय्या तागड,किसन दारकुंडे, सौ रोहिणी घोरपडे आदि सह,संचालक,सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वैभव खलाटे बोलताना म्हणाले की शिराळसोसायटी वेळोवेळी शेतकऱ्याचे हित जोपासत असून गावच्या विकासाची दूरदृष्टी असणारे नेतृत्व असणाऱ्या ना खंबीर साथ द्या व सभासदांनी घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करा व संस्थेची दरवर्षी शंभर टक्के वसुलीसाठी सहकार्य करावे असे खलाटे यांनी बोलताना सांगितले. अहवाल वाचन सोसायटीचे सचिव राधाकिसन मस्के यांनीकेले तरउपस्थिततांचे आभार शरद मुळे यांनीमानले. यावेळी ग्रामस्थ सभासद शेतकरी उपस्थित होते

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात हिंदी दिवस समारोह उत्साहात

**टाकळी ढोकेश्वर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस समारोह उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास अहमदनगर कॉलेजचे हिंदी विभागाचे प्रा.डॉ. अशोक घोरपडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एकनाथ जाधव यांनी केले. त्यांनी हिंदी भाषेचे महत्त्व, हिंदी साहित्याची समृद्ध परंपरा तसेच विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर करण्याची गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ. अशोक घोरपडे यांनी हिंदी भाषा व साहित्याच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हिंदी ही भारतातील विविध भाषिक समुदायांना जोडणारी महत्त्वपूर्ण भाषा असून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे वाचन, लेखन आणि अध्ययन वाढवावे असे आवाहन त्यांनी केले.

## केवळ कायद्याने नव्हे, तर विचारांतून स्त्री-पुरुष समानता रुजणे काळाची गरज!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**पारनेर :** स्त्री-पुरुष समानता ही केवळ कागदावर किंवा कायद्याच्या चौकटीत अडकून राहू नये, तर ती प्रत्येकाच्या दैनंदिन वर्तनातून आणि दृष्टिकोनातून प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. परस्परांच्या भावना आणि स्वाभिमानाचा आदर करणारी मानसिकता निर्माण झाली, तरच खऱ्या अर्थाने सुरक्षित व समताधिष्ठित समाजाची निर्मिती होईल, असा महत्त्वपूर्ण विचार डॉ. ऋत्विज म्हस्के-खिलारी यांनी मांडला.

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालयात 'लैंगिक समानता आणि संवेदनशीलता' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्षाच्या वतीने तरुणाईमध्ये समानतेचा दृष्टिकोन रुजावा, या उद्देशाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून संवाद साधताना डॉ. म्हस्के-खिलारी यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळी चर्चा केली. त्या म्हणाल्या, समाजाचा समतोल हा स्त्री-पुरुष समानतेवरच अवलंबून असून, हीच समता एका समृद्ध आणि प्रगत समाजाचा भक्कम पाया आहे. समानतेकडे केवळ 'हक्क किंवा अधिकार' म्हणून न पाहता, ती आपल्या विचारसरणीचा आणि सामाजिक वर्तनाचा एक अविभाज्य भाग बनली पाहिजे. समाजात वावरताना समोरच्या व्यक्तीच्या हक्कांसोबतच तिच्या भावनांची जाणीव ठेवणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

याप्रसंगी महिला सक्षमीकरण कक्षाच्या सदस्या प्रा. ज्योत्स्ना म्हस्के यांनीही तरुणाईला मार्गदर्शन केले. संस्कार आणि शिक्षणाची सांगड घालत त्या म्हणाल्या, लैंगिक समानतेची बीजे घरातूनच रोवली गेली पाहिजेत. लहानपणापासूनच मुलगा आणि मुलगी असा दुजाभाव न करता, दोघांनाही समान संधी आणि संस्कार दिले पाहिजेत. पारंपरिक रूढींना फाटा देत शैक्षणिक संस्थांनी लिंगभाव संवेदनशीलता विकसित करण्यासाठी पुढाकार घेतल्यास भविष्यात अधिक सन्मानपूर्ण समाज घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आपल गाव फौंडेशनच्या वतीने मनिषा मातेरे याचा सत्कार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील मनिषा गुलाबराव मातेरे या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण वर्ग १ या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल बाभुळवाडे ग्रामस्थ व आपलं गाव फौंडेशनच्या वतीने भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मनिषा मातेरे यांचे वडील पुणे येथे रिक्षा चालक असून मनिषा यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करुन त्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. मनिषा मातेरे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की प्रथम डी एड केले नोकरी मिळाली नाही म्हणून शासनाची परिक्षा देऊन कॅनॉल इन्स्पेक्टर म्हणून रुजू झाले. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले पदवी मिळाल्यानंतर मी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले अशाप्रकारे खडतर शिक्षण पुर्ण झाले. यावेळी आपलं गाव फौंडेशनचे अध्यक्ष डॉ सुरेश खणकर, बाळासाहेब नवले, सोन्याबापू पोटे, दिगंबर जगदाळे, स्वप्नील जगदाळे, दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे, गणपत जगदाळे, शिवाजी बोरुडे, रजनीकांत जगदाळे, संतोष बोरुडे, संगिता जगदाळे, शोभा कोरडे, श्रीराम पवार, प्रल्हाद साळवे, संजय साळवे, शिवाजी जगदाळे, गुलाबराव नवले, अच्युतराव जगदाळे आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुद्धिबळ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी श्रद्धा वाळूंज हिची निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** बुद्धिबळाच्या पटावर अचूक चालींचे प्रदर्शन करत देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेची विद्यार्थिनी श्रद्धा अजय वाळुंज हिने तालुकास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला.

जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर व श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या १७ वर्षांखालील बुद्धिबळ स्पर्धेत श्रद्धाने उल्लेखनीय कामगिरी केली. तिच्या या यशामुळे तिची जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली असून, आता जिल्हास्तरावर ती आपल्या खेळाची चमक दाखविणार आहे.

श्रद्धाला क्रीडाशिक्षक संदीप घावटे व अमोल कातोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समिती अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रीडा समिती अध्यक्ष सचिन जामदार, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक एन. एस. डुंबरे, संजय देशपांडे, के. बी. काळे तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## शेतकऱ्यांना पाठबळ देणाऱ्या निघोज सोसायटीचा नावलौकिक : वराळ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** सोसायटी ७५ वर्ष पुर्ण करीत आहे. अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून संस्थेचा नावलौकिक जिल्ह्यात असून हा नावलौकिक वाढविण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील असल्याची ग्वाही निघोज सोसायटीचे चेअरमन सुनील वराळ यांनी दिली आहे. निघोज सोसायटीची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२९ रोजी संस्थेच्या सभागृहात चेअरमन सुनील वराळ यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या प्रतिमेची पूजा करुण दिपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव रामदास भोसले यांनी अहवाल वाचन केले सर्व विषय सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजूर केले. यावेळी उपाध्यक्ष हिरामण सोनवणे संचालक शांताराम लाळगे, संतोष लामखडे, दत्तात्रय लंके, अंकुश लोखंडे, मनिषा वराळ, मंदा ढवळे, असिम हावलदार

यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. संस्थेचे सभासद व माजी उपसभापती खंडू भुकन, माजी अध्यक्ष अनंतराव वरखडे, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, दिलीप ढवण, सोमनाथ वरखडे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, ॲड. ज्ञानेश्वर कवाद, शत्रुघ्न लामखडे, शिवाजी डेरे आदींनी विविध प्रश्न उपस्थित करुन संस्था हिताच्या सुचना केल्या. यावेळी सभासदांनी सुचना करताना सांगितले की पुणे जिल्हा सहकारी बँक शेतकऱ्यांकडून फक्त मुद्दल रक्कम जमा करीत असून व्याज माफ करते यासाठी निघोज सोसायटीने फक्त मुद्दल कर्ज घेऊन व्याज घेऊ नये. सोसायटीने शेतीपूरक व्यवसाय सुरू करावा. तसेच खर्चात काटकसर करुन सभासदांना लाभांश वाटप करावे असे आवाहन केले.

यावेळी चेअरमन सुनील वराळ, व्हा. चेअरमन हिरामण सोनवणे, सचिव रामदास भोसले यांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी जुन्नर व पारनेर तालुका शिखर पाणीवापर संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवाजी डेरे यांचा संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक यशवंतराव वराळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डेरे यांनी प्रत्येक शेतकऱ्यांनी पाणी अर्ज घेऊन पाणी घेण्याचे आवाहन केले. पारनेर तालुक्यात फक्त साडेसतरा हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येत असून फक्त तीन हजार हेक्टर क्षेत्राची पाणी पट्टी भरण्यात येते असेच जर सुरू राहिले तर यावेळी राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. धरणे जरी ९५ टक्के भरली असली तरी पाण्यावर सरकारचे कडक नियंत्रण असल्याने पाणी अर्ज न घेतल्यास आपल्या कांदा या पिकाला सुध्दा पाणी मिळणार नाही यासाठी सर्व शेतकऱ्यांनी पाणी अर्ज घेऊन शंभर टक्के क्षेत्र ओलिताखाली येण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

# दुष्काळी परिस्थिती पंचनाम्यासाठी प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** यावर्षी मान्सून पावसाने चांगलीच ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरु करण्यात आल्या असून या पार्श्वभूमीवर शिंदेवाडी (ता. कर्जत) परिसरात शेतकऱ्यांच्या पिक नुकसानीच्या पंचनाम्यांस प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. भर उन्हात प्रशासन शेतकऱ्यांचा बांधावर प्रत्यक्ष जात माहिती गोळा करीत आहे.

कर्जतचे तलाठी प्रशांत जमदाडे, कृषी सहायक रोहन तोरडमल, नगरपंचायतीचे उमेश गलांडे यासह सागर नलवडे शेतकरी सागर मांडगे, नाविद पठाण यांनी कपाशी, बाजरी, मका आदी पिकांची स्थिती आणि झालेल्या नुकसानीची नोंद घेतली. कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील, तहसीलदार रवी सतवन यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाच्या पथकाने शेतशिवारात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी उपस्थित परिसरातील शेतकऱ्यांसोबत चर्चा करून कोणत्या पिकाचे किती क्षेत्र बाधित आहे पिकांची सद्यस्थिती काय आहे ? नुकसानीचे प्रमाण किती आहे ? याबाबत सविस्तर माहिती संकलित करण्यात येत असून ही नोंद शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या निकषांनुसार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

वास्तविक पाहता भर उन्हात सदरचे पंचनामे सुरू झाले असून शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जेऊर महसूल मंडळातील १२ गावांत नुकसानीचे पंचनामे सुरु



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर जेऊर महसूल मंडळात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. महसूल, कृषी व ग्रामपंचायत प्रशासनाच्या संयुक्त नियोजनानंतर विविध गावांमध्ये प्रत्यक्ष पंचनामे केले जात आहेत.

जेऊर, धनगरवाडी, ससेवाडी, बहिरवाडी, डोंगरगण, मांजरसुंबा गड, पांगरमल, उदरमल, मजले चिंचोली, आव्हाडवाडी, खोसपुरी, इमामपूर या गावांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी पंचनामा प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. एकही पात्र शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन नुकसानीची पाहणी केली जात असून पंचनामे केले जात आहेत.

नुकसानभरपाई व शासकीय मदतीसाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करून घ्यावा तसेच ई-पिक पाहणीमध्ये पिकांची नोंद करावी असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## राळेगण सिद्धी-पिंपळनेर मार्गावर धावणार ८०० स्पर्धक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर तालुक्यातील कन्हैय्या सोशल फाउंडेशनच्या वतीने (ता.०४) ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजता आयोजित करण्यात येणाऱ्या 'कन्हैय्या मॅरेथॉन २०२६' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ऑफलाइन व ऑनलाइन नोंदणी मिळून आतापर्यंत सुमारे ८०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला असून,विविध वयोगटांतील महिला व पुरुषांचा त्यात समावेश आहे.

राळेगण सिद्धी ते पिंपळनेर या मार्गावर ही मॅरेथॉन होणार आहे. स्पर्धेच्या सुरक्षित व नियोजनबद्ध आयोजनासाठी मार्गाची पाहणी करून धावण्याचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. दिशादर्शक फलक,वाहतूक नियोजन तसेच स्पर्धकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. स्पर्धेत १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर 'फन रन' असे तीन प्रकार ठेवण्यात आले आहेत.वयोगटानुसार तसेच महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र गट राहणार आहेत.प्रत्येक स्पर्धकाला क्रमांक,टी-शर्ट व पदक देण्यात येणार असून विजेत्यांना चषक देण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या मार्गावर वैद्यकीय पथक,डॉक्टर, रुग्णवाहिका,प्रथमोपचार पेटी,ओआरएस व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.तसेच वाहनतळ,छायाचित्रण,चित्रीकरण व अल्पोपाहाराची व्यवस्था केली जाणार आहे. फिटनेस,आरोग्य, शिस्त आणि सामाजिक सहभागाचा संदेश देणारी ही मॅरेथॉन सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी कन्हैय्या सोशल फाउंडेशनच्या आयोजन समितीने तयारी सुरू केली आहे.बक्षिस वितरण

माजी खा. डॉ.सुजय विखे-पाटील, आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते होणार आहे.

## दखल

### सासवडमध्ये आज नांदी साहित्य संमेलन

**सासवड :** पुण्यात होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापूर्वी राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या ९९ नांदी संमेलनांपैकी दहावे नांदी संमेलन सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात उद्या, १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी, सासवड आणि सोपाननगर शाखांच्या वतीने हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

उद्घाटन, व्याख्यान, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी या संमेलनात रसिकांना मिळणार आहे. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या सासवड येथील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, साहित्य परिषद सासवड शाखाध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, सोपाननगर शाखेचे युसुफ सय्यद, जेजुरी शाखाध्यक्ष डॉ. नारायण टाक आणि माजी अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब खाडे यांनी ही माहिती दिली. सकाळी दहा वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. संमेलनाध्यक्ष डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत साहित्य परिषदेचे अध्यक्ष मिलिंद सोमण उद्घाटन करतील. ८७ व्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विजय कोलते, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप आणि साहित्य परिषदेचे कार्यवाह सुनील महाजन उपस्थित राहणार आहेत.यानंतर ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे 'साहित्यातील राजकीय व्यक्तिमत्त्वे' या विषयावर व्याख्यान होईल. दुपारच्या सत्रात ज्येष्ठ राजकीय विश्लेषक माधव भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली 'राजकीय साहित्य व विचारसरणी' या विषयावर परिसंवाद होणार आहे. यात डॉ. नारायण टाक आणि डॉ. नानासाहेब पवार सहभागी होणार आहेत.सायंकाळी चार वाजता ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. मुं. शिंदे आणि निमंत्रक रावसाहेब पवार यांच्या उपस्थितीत नांदी संमेलनाचा समारोप होईल. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने 'सत्यशोधक महात्मा' ही नाट्यकृती सादर करण्यात येणार आहे.आढावा बैठकीस संतोष काकडे, वसंतराव ताकवले, बाळासाहेब मुळीक, हेमंत ताकवले, सुनील लोणकर, प्रा. संदीप टिळेकर, डॉ. राजेश दळवी, माऊली घारे, दादासाहेब जगताप, अक्षय पवार, दादा मुळीक आणि जगदीश शिंदे उपस्थित होते. प्रा. नंदकुमार सागर यांनी आभार मानले.

### एसआयआर घरी जाऊन कागदपत्रे संकलित करणार

**पुणे :** विशेष सखोल पुनर्निरीक्षण प्रक्रियेत नकाशीकरण न झाल्यामुळे किंवा तार्किक विसंगती आढळल्याने नोटीस बजावलेल्या मतदारांना आता सुनावणीसाठी निवडणूक नोंदणी अधिकारी अथवा सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात बोलावण्याची आवश्यकता राहणार नाही. संबंधित बूथस्तरीय अधिकारी मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे संकलित करून ती ईसीआयनेट प्रणालीवर अपलोड करतील. त्यानंतर निवडणूक नोंदणी अधिकारी कागदपत्रांची तपासणी करून निर्णय घेतील.

भारत निवडणूक आयोगाच्या २६ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. अपवादात्मक परिस्थितीत निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार सुनावणी घेता येईल. ही सुनावणी शक्यतो ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार मतदाराच्या वतीने कुटुंबातील कोणताही प्रौढ सदस्य सुनावणीस उपस्थित राहू शकणार आहे. ऑनलाइन सुनावणीची सुविधा अधिक सक्षम करण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत. रात्रीच्या निवाऱ्यांमध्ये राहणारे नागरिक, कामगार, गरीब, बेघर आणि इतर गरजू मतदारांसाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी आवश्यकतेनुसार मदत कक्ष सुरू करावेत किंवा विशेष शिबिरे आयोजित करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### शिरूर नगरपरिषदेतर्फे 'सेवा संकल्प' अभियानांतर्गत उपक्रम

**पुणे :** शिरूर नगर परिषदेमार्फत 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत शहराच्या सर्वांगीण स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. शहरातील शाळा, नदीकिनारे, व्यावसायिक भाग तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात येत आहे.

शहर स्वच्छ व कचरामुक्त ठेवण्याच्या उद्देशाने शाळा-महाविद्यालयांमध्ये तसेच घरोघरी कचरा वर्गीकरण, ओला-सुका कचरा व्यवस्थापन आणि घरगुती कंपोस्टिंग याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करून पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनात सहभागी व्हावे, यासाठी नगर परिषदेकडून सातत्याने प्रबोधन केले जात आहे.पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून सोनार आळी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले असून, शहरातील इतर भागांतही आगामी काळात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हरित क्षेत्र वाढविण्यासाठी नगर परिषदेकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यासोबतच शहरातील जलस्रोतांची स्वच्छता व संवर्धन यावरही विशेष भर देण्यात आला आहे. जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.गणेशमूर्तींच्या विसर्जनानंतर नदी, तलाव व इतर जलस्रोतांमध्ये निर्माल्य जाणार नाही, यासाठी निर्माल्य संकलनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. संकलित निर्माल्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करण्यात येणार असून, कचऱ्याचे संसाधनात रूपांतर करण्याचा हा उपक्रम पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना देणारा ठरणार आहे.

# जिल्हा परिषद शाळांतून परकीय भाषांचे धडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक भाषा, संस्कृती आणि विविध देशांची ओळख करून देण्यासाठी पुणे जिल्हा परिषद आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने परकीय भाषा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष असून यंदा जिल्ह्यातील २१९ शिक्षक जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन आणि जपानी या पाच भाषांचे प्रशिक्षण घेत आहेत.



यामध्ये जर्मन भाषेसाठी १२६, फ्रेंच २२, स्पॅनिश २२, रशियन २३ आणि जपानी भाषेसाठी २५ शिक्षक सहभागी झाले आहेत. शिक्षकांसाठी १८० तासांचा संरचित भाषा अभ्यासक्रम राबविला जात असून ऐकणे, वाचन, लेखन आणि संभाषण या चारही कौशल्यांवर प्रशिक्षणात भर दिला जात आहे.

परकीय भाषा शिकणे म्हणजे केवळ नवीन शब्द किंवा लिपी समजून घेणे नाही, तर संबंधित देशाची संस्कृती, परंपरा, जीवनपद्धती आणि जागतिक संदर्भ समजून घेणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. प्रशिक्षण घेतलेले शिक्षक आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना या भाषांची तसेच संबंधित देशांच्या संस्कृतीची प्राथमिक माहिती देणार आहेत.

पहिल्या वर्षी जिल्ह्यातील १०२ शिक्षकांनी परकीय भाषांचे प्रशिक्षण घेतले होते. या शिक्षकांनी प्रत्येकी सुमारे ५० विद्यार्थ्यांपर्यंत भाषा आणि संस्कृतीविषयक माहिती पोहोचविली. त्यामुळे पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लाभ मिळाला.

ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच विविध भाषा आणि संस्कृतींची ओळख व्हावी, त्यांच्यात जागतिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि विविध देशांविषयी कुतूहल वाढावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. मातृभाषेत शिक्षण घेत असतानाच अन्य भाषा आणि संस्कृती समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत आहे.

परकीय भाषांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध भाषा, संस्कृती आणि जागतिक संदर्भांची ओळख करून देता येते. शिक्षकांच्या क्षमता वृद्धीसोबतच या उपक्रमाचा लाभ हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे, असे पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले.

# चंगळवादामुळे Gen न पिढीवर परिणाम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** बदलत्या जीवनशैलीत चंगळवादाचा प्रभाव वाढत असून त्याचा विशेष परिणाम Gen न पिढीवर होत आहे. गरज नसताना केवळ दिखावा, क्षणिक आनंद आणि इतरांशी तुलना करण्यासाठी वस्तूंची खरेदी करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे मत पुणे महानगरपालिका प्राथमिक शिक्षक शिवाजी बबनराव गावडे यांनी व्यक्त केले.



आजच्या विद्यार्थ्यांकडे महागडे मोबाईल असतानाही शैक्षणिक साहित्याची कमतरता दिसून येते. मोठ्या ब्रँडची बॅग असते; मात्र त्यामध्ये आवश्यक पुस्तके नसतात. ही परिस्थिती वाढत्या चंगळवादाचे उदाहरण असल्याचे गावडे यांनी सांगितले.

सोशल मीडिया, इन्फ्लुएन्सर, जाहिराती, फास्ट फॅशन, ऑनलाइन खरेदी आणि ओटीटी माध्यमातून आकर्षक जीवनशैलीचे चित्र सातत्याने दाखवले जाते. त्यामुळे वास्तव जीवन आणि सोशल मीडियावरील जीवन यांची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सवलतीच्या नावाखाली गरज नसलेल्या वस्तूंची खरेदी केली जाते. परिणामी आर्थिक नियोजनावरही परिणाम होतो.

चंगळवादाचे मानसिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक परिणाम होत असल्याचे गावडे यांनी नमूद केले. महागड्या वस्तूंची मागणी, मित्रांशी तुलना आणि सोशल मीडियावरील दिखाव्यामुळे मुलांमध्ये असमाधान वाढू शकते. अभ्यासापेक्षा ऑनलाइन मनोरंजन आणि खरेदीविषयक सामग्रीकडे आकर्षण वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकांनी मुलांना पैशांचा हिशेब ठेवण्याची सवय लावावी. वाढदिवस किंवा अन्य प्रसंगी अनावश्यक महागड्या वस्तूंऐवजी पुस्तके देण्यास प्राधान्य द्यावे. पालकांनी स्वतः साधी जीवनशैली स्वीकारणेही महत्त्वाचे आहे. मुले केवळ ऐकून नव्हे, तर पालकांचे आचरण पाहून शिकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मुलांना दोष न देता दिशा देण्याची गरज :

Gen न पिढीला दोष देण्याऐवजी योग्य दिशा देण्याची गरज आहे. एखादी वस्तू खरेदी करण्यापूर्वी २४ तास थांबणे, वस्तूची किंमत पालकांच्या श्रमाशी जोडून पाहणे आणि वस्तूंपेक्षा अनुभव व कौशल्यांमध्ये गुंतवणूक करण्याची सवय मुलांना लावावी, असे आवाहन गावडे यांनी केले.

# निरगुडसर येथे बिबट्याच्या हल्ल्यात दोन मेंढ्या ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** निरगुडसर-मेंगडेवाडी रस्त्यादरम्यान थोरात मळा परिसरात बिबट्याने मेंढ्यांच्या गोठ्यावर हल्ला करून दोन मेंढ्या ठार केल्याची घटना बुधवारी पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



कैलास शांताराम सुडके यांच्या मेंढ्यांचा गोठा थोरात मळ्यात आहे. बुधवारी पहाटे चारच्या सुमारास मेंढ्यांचा पळण्याचा व ओरडण्याचा आवाज आल्याने सुडके गोठ्याकडे धावले. त्यावेळी एक बिबट्या मेंढीला उचलून कंपाउंडवरून पळून जाताना दिसला. त्यांनी गोठ्यात पाहणी केली असता ब्रिडिंगसाठी आणलेला सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मोठा नर मेंढा बिबट्याने ठार केल्याचे निदर्शनास आले. तसेच आणखी एका मेंढीचाही बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच मिलिंद वळसे पाटील यांनी निरगुडसर येथील रेस्क्यू टीम मेंबर डॉ. अतुल साबळे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर वनविभागाच्या वनरक्षक अश्विनी डफळ, वनमजूर मेंगडे तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. या हल्ल्यात पशुपालकाचे अंदाजे ८० ते ९० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने पशुपालकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# रयत शेतकरी संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी रवीप्रकाश उर्फ बापूसाहेब देशमुख यांची निवड

## केडगाव चौफुला येथे उत्साहात सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत :** शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी अहोरात्र लढणाऱ्या रयत शेतकरी संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी दौंड तालुक्यातील सुपुत्र रवीप्रकाश उर्फ बापूसाहेब देशमुख यांची नियुक्ती जाहीर झाल्याबद्दल श्री क्षेत्र हीबोरमलनाथ देवस्थान, केडगाव चौफुला येथे त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.



रयत शेतकरी संघटनेने गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी, कष्टकरी, आदिवासी आश्रम शाळेतील कर्मचारी व वंचित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे. या सत्कार सोहळ्याचे आयोजन संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष अनिता दिनकर, पुणे जिल्हा महिला अध्यक्ष कल्पना गव्हाणे, मुरबाड तालुका अध्यक्ष कांचनताई कपडे यांच्या हस्ते पुष्पहार, शाल आणि श्रीफळ देऊन बापूसाहेब देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना बापूसाहेब देशमुख म्हणाले की, माझ्यावर टाकलेला विश्वास मी सार्थ ठरवीन. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव, आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आणि शेतमजुरांच्या न्यायासाठी देशभर संघटनेचे जाळे अधिक मजबूत करणार आहे.

या कार्यक्रमास पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस अंकुश हंबीर, गणेश गव्हाणे, कृष्णा गोडांबे, विवेकानंद मुंढे, राजेंद्र निचिते, आश्रम शाळेचे पहारेकरी तसेच संघटनेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मानले. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भरधाव कारची दोघांना धडक; एकाचा मृत्यू, एक जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** मलठण-कवठे येमाई अष्टविनायक मार्गावरील मुंजाळवाडी जिल्हा परिषद शाळेजवळ भरधाव स्विफ्ट कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोघांना जोरदार धडक दिली. या अपघातात संतोष शंकर मुंजाळ यांचा मृत्यू झाला, तर सबाजी भागा मुंजाळ जखमी झाले.शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्विफ्ट कार क्रमांक एमएच ०४ एफझेड ७७७० चा चालक वैभव ढोमे, रा. पिंपरखेड, याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविले. मुंजाळवाडी जिल्हा परिषद शाळेजवळील स्पीडब्रेकरवर वेग कमी न करता त्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोघांना धडक दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# आरटीई प्रवेशात बनावट कागदपत्रांचा आरोप; १४ पालकांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ अंतर्गत प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्यक्ष वास्तव्य नसलेल्या पत्त्याचे कथित बनावट रहिवासी कागदपत्रे सादर केल्याच्या आरोपावरून १४ पालकांविरुद्ध खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित पालकांनी खोटे रहिवासी पुरावे सादर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड अमोल विजय जंगले (वय ३६, रा. बोरघर, ता. आंबेगाव) यांनी खेड पोलिसांकडे फिर्याद दिली आहे.पोलिसांकडे दाखल फिर्यादीनुसार, मार्च ते मे २०२६ या कालावधीत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी पालकांनी पंचायत समिती खेड येथील तालुकास्तरीय समितीकडे अर्ज केले होते. अर्जांसोबत सादर केलेल्या रहिवासी पुराव्यांची तपासणी करताना काही कागदपत्रांबाबत संशय निर्माण झाला. त्यानंतर संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.आळंदी येथील डॉ.विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूलमध्ये प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांमध्ये गणेश अरुण साळुंखे, सतीश दत्तात्रय गुंड, उत्तरेश्वर आश्रुबा गोचडे, योगेश बबन सातपुते, समीर रामचंद्र गोरे, राहुल भगवान चौधरी, वैभव होणाजी मोहिते, अजय मच्छिंद्रनाथ विरकर, संदीप दादा शिंदे आणि रमाकांत आनंदराव चव्हाण यांचा समावेश आहे. हे पालक केळगाव, हनुमानवाडी व आळंदी परिसरातील रहिवासी असल्याचे अर्जात नमूद करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

तसेच आंबेठाण येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रवेशासाठी दयानंद फकीरप्पा कुंभार, संदीप भिमराव कांदेकर पाटील, निलेश देवराव शेकार आणि अंगद दिलीप राऊत यांनी अर्ज केला होता. हे पालक चाकण व आंबेठाण परिसरातील रहिवासी असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या १४ पालकांनी आरटीई प्रवेशासाठी कथित खोटी रहिवासी कागदपत्रे सादर केली असून, संबंधित पत्त्यावर प्रत्यक्ष वास्तव्य नसतानाही प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकारातून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास खेड पोलिसांकडून सुरू असून, कागदपत्रांची सत्यता, संबंधित पत्त्यांवरील प्रत्यक्ष वास्तव्य आणि आरटीई प्रवेश प्रक्रियेत त्यांचा वापर याबाबत तपास केला जात आहे.

# करिअर, सायबर व रस्ता सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**विश्रांतवाडी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, विश्रांतवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी करिअर, सायबर सुरक्षा आणि रस्ता सुरक्षेबाबत जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मेंटल कॉर्नर, पुणे येथे आयोजित करिअर मार्गदर्शन सत्रात शिवचरित्रकार हसन सय्यद यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधी, योग्य करिअरची निवड आणि भविष्यातील शैक्षणिक वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षा आणि रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात फलटण उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाते यांनी सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची काळजी, वाहतूक नियमांचे पालन, रस्ता सुरक्षा आणि सुरक्षित वाहनचालना याबाबत माहिती दिली.या उपक्रमांना वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयक जागरूकता निर्माण करण्यासोबतच सायबर सुरक्षा आणि रस्ता सुरक्षेबाबत जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यासाठी हे उपक्रम उपयुक्त ठरतील, असे वसतिगृह गृहप्रमुख विजयश्री बाबर यांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते, की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक १) श्री. आनंद तुकाराम आमराळे, २) सौ. तुळसाबाई तुकाराम आमराळे रा. अमराळेवाडी, घर नं. ४४२ पो. अंबडवेट ता. मुळशी जि. पुणे ४१२११५. ३) कै. पार्वतीबाई बबन आमराळे (मयत) तर्फे वारस ३अ) सौ. दिपाली दिलीप ढोरे रा. बी११०४अल्पिणे टॉवर, समतानगर, ठाकुर कॉलेज कांदिवली मुंबई, ३ब) सौ.नंदा सुर्यकांत कदम रा.४ए, ३०६ नांदे रोड, म्हाळुंगे पुणे ४११०४५, ३क) सौ. कुंदा रमाकांत नलावडे, रा. फ्लॅट नं. ३०१, गगन ३३ शिवनेरी नगर, बाणेर पुणे ४११०१५, ३ड) सौ. आरती सुभाष पाटील, रा. फ्लॅट नं ४०१ स.न.३३ साई वाटीका शिवनेरी कॉलनी बाणेर पुणे ४११०४५. ४) सौ. संगिता श्रीकांत दगडे (मयत) तर्फे वारस ४अ) श्री. श्रीकांत काशिनाथ दगडे, ४ब) दिपा श्रीकांत दगडे (मयत) अविवाहित, ४क) श्री. प्रमोद श्रीकांत दगडे, ४ड) प्रफुल्ल उर्फ मंगेश श्रीकांत दगडे, रा. मु. बावधन बु. ता. मुळशी पुणे ४११०३३. हे सदर मिळकतीचे एकमेव मालक आहेत. यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देणेचे मान्य व कबुल करुन, कायमखुष खरेदी करणे संदर्भात व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, बोजारहित व निजोखमी असल्याची व सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध व अधिकार नाही तसेच हि मिळकत स्वकष्टार्जित मालकी हक्काची व ताबेवहिवाटीची आहे, असा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी खालील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही हक्क उदा. वारसाहक्क, गहाण, दान, लिन, लिज, साठेखत, विसारपावती, करारनामा इत्यादी स्वरुपाचा हक्क व अधिकार असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर मुळ कागदपत्रांसहित समक्ष भेटुन, आमचे खात्री करुन द्यावी अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क अगर हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी ते जाणीवपर्वक सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत आहे चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी, ता.मुळशी जि. पुणे मे. सब रजिस्ट्रार साहेब मुळशी यांचे कार्यक्षेतील तसेच पुणे जिल्हा परिषद यांचे हद्दीतील गावं मौजे अंबडवेट येथील औद्योगिक जमिन सर्व्हे नं. १३४/२० यांसी ००हे. १४ आर पैकी ३अ, ब, क ड यांच्या अविभक्त हिश्याची ००हे. ७.१० आर व १ व २ यांच्या हिश्याची ००हे ०३ आर सौ. संगिता श्रीकांत दगडे यांचा संपुर्ण अविभक्त हिस्सा सोडुन असे एकुण क्षेत्र ००हे. १०.१० आर यांसी आकार ००रु. ६२ पैसे यासह हि औद्योगिक जमिन मिळकत. यांसी चर्तुसीमा खालीलप्रमाणे : पुर्वेसः १३४/२० उर्वरित मिळकत, दक्षिणः रस्ता, पश्चिमः १३४/२१, उत्तरेसः १३४/१२, १३४/१६

येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिले असे.

दि. 01/10/2026

**ॲड.सचिन एन. पोटे**
कार्यालय येथे: सीटीएस क्र. 291, ऑफ क्र. 2, ग्राउंड फ्लोर, जयदीप अपार्टमेंट, दिलीप स्मृती भवन व्ही.एस. कोठारी रोड, न. काटे राम मंदिर, नारायण पेठ पुणे-411030.
मो. नं. 9657720187., ईमेल-advsnpote@gmail.com

### गहाळ कागदपत्रांबाबत जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटसीने कळविण्यात येते कि, गाव मौजे कोंढवा खुर्द, ता. हवेली, जि. पुणे येथील **स.नं. १ए/१/२ मधील प्लॉट नं. १,२ ते १३,२२,४७ते ५२,६३ ते ६५,६८ ते ७० व ८० ते ८८ वरील "कल्पित अपार्टमेंट"** या बिल्डींगमधील **शॉप नं. सी, शॉप नं. डी, बेसमेंट गोडाऊन व फ्लॅट नं. २ए** या मिळकतीबाबत कर्जमाफी योजनेतील **केस नं. १११७/२००८** व १७११/२००८ तसेच सदर मिळकतींबाबत **मे. स्पेंटा कन्स्ट्रक्शन तर्फे डायरेक्टर सौ. फीरोझा ॲस्पी ईराणी उर्फे फिरोझा ताफ्टी व श्री रफिक बाबु शेख यांचेमध्ये दिनांक ३०/०९/१९९९ रोजी नोंदविण्यात आलेले रजिस्टर करारनामा व दिनांक १९/१२/२००३ रोजी नोंदविण्यात आलेले ॲग्रीमेंट टु सेल** हे दस्त गाव कोंढवा ता. हवेली जि. पुणे येथुन गहाळ झालेले आहेत. त्याबाबत श्री रफिक बाबु शेख यांनी दिनांक २९/०९/२०२६ रोजी कोंढवा पोलीस स्टेशन यांच्याकडे **गहाळ वस्तु तक्रार क. १४१९६५/२०२६** अन्वये तक्रार केलेली आहे. त्याची पोलीस स्टेशनमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. सदरचा मुळ दस्त कोणास सापडल्यास कोंढवा पोलीस स्टेशन यांचेकडे जमा करावा अथवा श्री रफिक बाबु शेख यांचेकडे जमा करावा त्यासाठी मो. नं. ७३५००५६५५५ मोबाईल वर संपर्क करावा.

दिनांक: 01/10/2026

**श्री. अविनाश एस. भुजबळ**
ॲडव्होकेट
ऑफिस नं.०७,छत्रपती कॅपिटल, शिक्रापुर रोड, चाकण,ता.खेड, जि. पुणे,मो.९३७३ ७३६५२९

# गच्चीवर हत्यारांसह तरुण आढळला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शिवसेना नेत्या तथा विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुण्यातील 'सिल्वर रॉक्स' निवासस्थानाच्या गच्चीवर २६ सप्टेंबरच्या पहाटे एक अनोळखी तरुण हत्यारांसह आढळून आला. सुरक्षा रक्षक आणि कर्तव्यावरील पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्याला तातडीने ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घराचा पाणीपुरवठा बंद झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुरक्षा रक्षक पाण्याच्या टाकीची पाहणी करण्यासाठी गच्चीवर गेला. त्यावेळी तेथे संबंधित तरुण आढळला. पाण्याचे कनेक्शन तोडलेले असल्याचेही निदर्शनास आले. पोलिसांनी तरुणाकडून हातोडा, पकड, दोरी आणि हातमोजे जप्त केल्याची माहिती आहे.

उपलब्ध सीसीटीव्ही चित्रणानुसार संबंधित तरुण पहाटे सुमारे तीन वाजता गच्चीवर गेला आणि सकाळपर्यंत तेथेच होता. घटनेच्या वेळी डॉ. नीलम गोऱ्हे बाहेरगावी होत्या.

या घटनेबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. संबंधित तरुण विद्यार्थी असल्याचे कागदपत्रे पोलिसांच्या तपासात आढळली असली, तरी हत्यारांसह एखादा व्यक्ती दुसऱ्याच्या घराच्या गच्चीवर एवढा वेळ का थांबला, याचा तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेमागील नेमका हेतू पोलिस तपासातून स्पष्ट व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संबंधित तरुणाला सोडण्यासाठी काही जणांनी पोलिसांना फोन केल्याची चर्चा कानावर आल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. पोलिस आयुक्तांनी कोणत्याही फोनचा तपासावर परिणाम होणार नसल्याचे आश्वासन दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमागे राजकीय हेतू आहे का, हे तपासानंतरच स्पष्ट होईल, असेही त्यांनी नमूद केले.

यापूर्वी निवासस्थानावर दगडफेक तसेच धमक्यांचे प्रकार घडल्याचे सांगत डॉ. गोऱ्हे यांनी सुरक्षेचे नव्याने मूल्यांकन करण्याची मागणी केली. परिसरातील अंधार आणि बंद असलेल्या पथदिव्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. चोरीचा हेतू असण्याची शक्यता नाकारता येत नसली, तरी संबंधित तरुणाचा नेमका उद्देश पोलिस तपासातूनच स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे निरगुडसर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. संजय सावकार पोखरकर यांचे नावे सातबारा सदरी व मालकी ताबे वहिवाटीस असून सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व खात्री विदयमान मालकांनी आमचे अशिल यांस दिली. त्यांना सदर मिळकत विक्री करावयाचे असल्याने त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल करुन त्यांचेकडून इसार स्विकारला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, पोटगी, कुळ, खंड, ताबा, वहिवाट, विसार, साठेखत, विकसन करार, कुलमुखत्यार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून सहा दिवसांचे आत आमची मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री पटवून तशी लेखी हरकत नोंदवावी मात्र मुदतीत कोणाचीही हरकत वा तक्रार न आल्यास ज्या कोणाचा हक्क हितसंबंध होता त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही.

परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन-मिळकत तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका आंबेगाव मे. सह दुय्यम निबंधक सोर. आंबेगाव यांचे हद्दीतील गाव मौजे निरगुडसर येथील खाते नं. १९३२५० वरील जमिन गट नं. ८९/३ पैकी क्षेत्र ०० हे १० आर.

मंचर, दि. ३०/०९/२०२६

**श्री. आशिष पांडूरंग काजळे**
ॲडव्होकेट मु.पो. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
मो.नं. ९९६०२१९२१९

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, शिवाजी खंडू भांबुरे मुक्काम पोस्ट चांडोली तालुका खेड जिल्हा पुणे ४१०५०५

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-14-HY-9152 असे असून सदर दोन चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती अश्विनी शिवाजी भांबुरे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-०९/०९/२०२६

**अश्विनी शिवाजी भांबुरे**
मुक्काम पोस्ट चांडोली,
तालुका खेड जिल्हा पुणे

# वृद्धेश्वर कारखान्याच्या बदनामीचे आरोप सहन करणार नाही : आ. राजळे

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** वृद्धेश्वर कारखान्याचा वजन काटा सदोष आहे. असा वारंवार खोटा प्रचार करून संचालक मंडळाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू नका. ज्याला शंका असेल त्यांनी वजन काट्या पुढे एक वेळ उभे राहून खात्री करावी. शेतकऱ्यांचे नुकसान करण्याचे पाप आम्ही करणार नाही.

कारखान्याची बदनामी व वारंवार तेच तेच खोटे आरोप आम्ही सुद्धा सहन करणार नाही, अशा शब्दात वृद्धेश्वर कारखान्याच्या संचालक तथा आमदार मोनिका राजळे यांनी विरोधकांना स्पष्टपणे सुनावले.

कारखान्याची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याचे अध्यक्ष अप्पासाहेब राजळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला सर्व संचालक, कारखान्याच्या विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवशंकर राजळे, बाळासाहेब गर्जे, बबन बांगर अशा निवडक कार्यकर्त्यांनी सभेचे कामकाज सुरू असताना विविध मुद्द्यांना पुढे करत संचालक मंडळाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

जाहीर रित्या वजन काट्याचा विषयावरून संचालक मंडळाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण झाल्याने आमदार मोनिका राजळे



यांनी अत्यंत कडक शब्दात उत्तर देत आक्रमक पवित्रा घेतला.

विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर झाल्यानंतर ऐनवेळेच्या विषयांमध्ये बोलताना शिवशंकर राजळे यांनी कारखान्यावर असलेले कर्ज, एकूण तोटा, सभासद वारसांच्या नोंदी, सभासदांसाठीच्या साखरेच्या किमतीत अचानक केलेली दरवाढ या मुद्द्यांबरोबरच आगामी गाळप हंगामाचा दर जाहीर करण्याची मागणी केली. वृद्धेश्वर कारखाना ऊसतोड वेळेवर करीत नाही. कारखान्याच्या वजन काट्यावर लोकांचा विश्वास नाही असा आरोप केला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बाळासाहेब गर्जे यांनी उसाला यावर्षी किमान पाच हजार रुपये भाव द्यावा, सभासद वारसा प्रमाणपत्र सभासदांसाठीच्या साखरेची चुकीच्या पद्धतीने केलेली दरवाढ रद्द करून सभासदांना नियमानुसार ३१ रुपये प्रति किलो दरानेच साखर मिळावी असे मुद्दे पुढे करत सभासदांनी वृद्धेश्वरलाच ऊस द्या टिपूर सुद्धा बाहेर जाऊ देऊ नये असे नियोजन संचालक मंडळाने करावे. मागील हंगामाचे उर्वरित पेमेंट २७० रुपये प्रति टनाप्रमाणे व्हावी अशी मागणी केली.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या, पाट पाण्याच्या तालुक्याचा भाग सोडला तर पाण्याची गंभीर परिस्थिती आहे. सध्या चाऱ्यासाठी उसाची तोड मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. शासनाच्या सर्वेक्षणानुसार दोन महिने पुरेल एवढाच चारा शिल्लक आहे. दुष्काळामुळे तालुक्याचे अर्थचक्र बिघडले. यंदा उसाची पळवा पळवी वाढणार आहे. कारखाना व्यवस्थित चालून शेतकऱ्यांना लाभ व्हावा, कामगार, मजुरांचे प्रपंच सुरळीत चालावेत, अशी संचालक मंडळाला तळमळ असून तशा दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. ज्यांनी बाहेरच्या कारखान्यांना ऊस दिला त्या शेतकऱ्यांचे पेमेंट वेळेवर मिळाले नाही. काहींचे अजूनही पैसे अडकून पडले आहेत.

दाच्या हंगामासाठी संचालक मंडळाकडून ऊस उत्पादकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला जात आहे. वृद्धेश्वर ने एफ आर पी पेक्षा कधीही भाव कमी दिलेला नाही. गावगाडा सांभाळताना वित्तीय संस्था, बँका, कामगार, तोडणी मजूर, कर्ज हप्त्यांची परतफेड व व्याज अशा सर्व गोष्टींचा ताळमेळ घालत शासन निर्णयाच्या आदेशाचे पालन करत दराबाबतचा निर्णय होतो. उसाच्या बाबतीत वृद्धेश्वर कारखान्याला सहकार्य करावे. आपला कारखाना आपल्या भागाचे वैभव आहे.

तो टिकला पाहिजे, तो चालला पाहिजे, अशी भावना ऊस उत्पादकांनी मनात बाळगावी. हंगामा पुढील अडचणी पाहता सर्वांनीच संयम बाळगावा. कारखान्याचे व आपले भावनिक नाते असून आतापर्यंत ऊस उत्पादकांच्या अडीअडचणींना कारखाना धावून आलेला आहे.

कोणत्याही आमिषाला उत्पादकांनी बळी पडू नका. शेजारच्या कारखान्यांच्या तोडीस तोड आपण भाव देऊ, असे राजळे म्हणाल्या. यावेळी सुभाष ताठे यांनी स्वागत केले. संभाजी राजळे यांनी नफा तोटा पत्रक व ताळेबंद सादर केला.

रवींद्र महाजन यांनी अहवाल वाचन केले, तर श्रीकांत मिसाळ यांनी आभार मानले.

---

# धर्मनिरपेक्षता ही काळाची गरज : प्रा. आहेर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही आजच्या काळाची गरज असून, समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि विषमता दूर करण्यासाठी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांचे विचार आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कलावंत प्रा. कुमार आहेर यांनी केले. याप्रसंगी डॉ. मुदस्सीर सय्यद, मुख्याध्यापक संदिप महांडुळे , कविवर्य रामदास भालेराव, शिक्षक लतिफ राजे, वसंत काळे, राजाराम वाघ, महेंद्र वाबळे, बाबासाहेब फंड, राधुजी चौधरी, प्रविणचंद्र गुंजाळ आणि पत्रकार भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.

धन्वंतरी मेडिकल एड एज्युकेशनल फाउंडेशन संचलित आश्रमशाळेत प्रसिद्ध नटश्रेष्ठ प्रा कुमार आहेर यांच्या नाट्यकलेतून साकारलेला 'मी सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले बोलतोय' हा एकपात्री प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या प्रयोगाला विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रा. आहेर यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवन कार्याचा आणि विचारांचा जीवनपट सजीव केला. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे प्रभावी चित्रण केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, शोषित-वंचित घटकांसाठीचे कार्य आणि सत्यशोधक विचार यांचे महत्त्व त्यांनी प्रयोगातून अधोरेखित केले. प्रयोगा दरम्यान संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, फातिमा शेख आणि अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा संदर्भ देत सामाजिक परिवर्तनाच्या विविध पैलूंवर भाष्य केले. समाजात आजही आढळणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि विषमतेवर प्रा. आहेर यांनी परखडपणे प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून प्रश्न विचारण्याची आणि विवेकबुद्धीने विचार करण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली.

एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून इतिहासातील समाजसुधारकांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आले. अभिनय, संवादफेक आणि आशयपूर्ण मांडणी यामुळे प्रयोगाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना बळकटी देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

---

# ज्ञानदेव सुंबरे यांच्या विक्रमाची महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** पिंपळगाव रोठा गावचे सुपुत्र व श्री हरेश्वर शिक्षण संस्था कर्जुले हर्या संचलित पळशी येथील मलवीर माध्यमिक विद्यालयातील शिक्षक ज्ञानदेव सुंबरे यांची महाराष्ट्र बुक ऑफरेकॉर्ड्स मध्ये नोंद झाली आहे मांडओहोळ धरणात पोहण्याच्या राज्यस्तरीय यशाची विक्रम म्हणून महाराष्ट्र ग्रुप ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद घेतली आहे



पन्नाशीतील ज्ञानदेव सुंबरे यांनी मांडओहोळ धरणात सलग १४ किलोमीटर अखंड पोहण्याचा विक्रम मागील वर्षी दीपावलीच्या दिवशी केला त्यांच्या विक्रमाची दखल महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड मध्येनोंद घेण्यात आली आहे. राज्य पातळीवरील एखाद्या क्षेत्रात उच्चांक करणाऱ्या संस्था व व्यक्तींची नावे नोंदविणारे बहुभाषिक जाहिरात विरहित आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने सुंबरे यांच्या पराक्रमाची दखल घेतली आहे. ज्ञान, शिक्षण, मनोरंजन क्षेत्रावर या नियतकालिकाचा भर आहे.आंतरराष्ट्रीय विक्रमाच्या पुस्तकात पान नंबर ७० व ७१ वर सुंबरे यांच्या पराक्रमाची माहिती विशद केली आहे व विक्रमाचे प्रमाणपत्र व पदक पाठविले आहे. वयाच्या पन्नाशीत उत्कृष्ट थलेटिक्स, शारीरिक क्षमता,चिकाटी,जिद्द व दररोज दोन तास जिद्दीने सराव,गेली पंधरा वर्षातील सरावातील सातत्य, शिवाय दररोज १०० सूर्यनमस्कार व अन्य व्यायामाबरोबर पोहण्याला धावण्याची साथ दररोजचा सामान्य पण नियमित आहार तसेच गेली १५ वर्ष नियमित पोहण्याचा सराव या जोरावर मांडओहोळ धरणाचे हे १४ किलोमीटर अंतर त्यांनी पाच तासात पोहून पूर्ण केले.

---

# कळसपिंप्री येथील वायरमनची बदली करा

## महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना ग्रामस्थांचे निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील कळसपिंप्री येथील महावितरणचे वायरमन गेल्या काही महिन्यांपासून कर्तव्यावर गैरहजर राहून मनमानी कारभार करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित वायरमनची तात्काळ हकालपट्टी किंवा बदली करून गावातील वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, कळसपिंप्री येथे नेमणुकीस असलेले वायरमन गेल्या ३ महिन्यांपासून रुजू झाल्यापासून गावात आलेलेच नाहीत. संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा मोबाईल फोन बहुतांश वेळा बंद असतो. फोन लागल्यास ते ग्रामस्थांशी अरेरावीची व अर्वाच्च भाषा वापरतात.



सध्या शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी विजेची अत्यंत गरज आहे. मात्र, वायरमनच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या आठ दिवसांपासून मुख्य लाईन्स तुटलेल्या आहेत. शेतीपंपासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी वीज उपलब्ध नसल्याने पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे

वायरमन गावात उपलब्ध नसल्यामुळे आणि विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे नागरिक स्वतः विजेचे कामे करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे गावात विजेचे झटके बसण्याच्या आणि शॉटसर्किटच्या घटना घडल्या आहेत. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासन व संबंधित वायरमनची राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन संबंधित वायरमनची गावातून बदली करावी व गावातील वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा पुढील काळात उद्भवणाऱ्या प्रसंगाला प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवेदनाच्या प्रती अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार ना. मोनिकाताई राजळे, जिल्हाधिकारी (अहमदनगर) आणि तहसीलदार (पाथर्डी) यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. निवेदनावर कळसपिंप्री येथील अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

## द•ख•ल

### ग्राहक-सभासदांच्या विश्वासातून बँकेची भक्कम वाटचाल : गिंताजली शेळके

**निघोज :** सभासद, ठेवीदार, खातेदार यांचा विश्वास व संचालक मंडळ, कर्मचारी,अधिकारी वर्गाच्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे बँकेने



प्रगतीची भक्कम वाटचाल सुरू ठेवली आहे.सातत्याने शून्य टक्के नक्त एनपीए राखत व सलग 'अ' लेखापरीक्षण वर्ग प्राप्त करत बँकेने आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविले आहे असे प्रतिपादन बँकेच्या अध्यक्षा गिंताजली शेळके यांनी केले. परेल (मुंबई)येथे जी.एस.महानगर बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी उपाध्यक्ष भास्कर कवाद,सतिष खणकर,बबन लंके,रविंद्र ढोले,श्रीधर कोठावळे,संतोष रणदिवे,विलास पालवे,गणेश गुंजाळ,मंगेश खोसे,कुंदा खोसे,संतोष पठारे,शंकर शिंदे,पांडुरंग शिंदे,भिवाजी थोरात,मंगलदास थोरात,छाया वाढवणे हे संचालक उपस्थित होते. उपाध्यक्ष कवाद म्हणाले,या आर्थिक वर्षात बँकेला ८ कोटी ४५ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे.बँकेच्या ठेवींमध्ये या आर्थिक वर्षात १५३ कोटी रुपयांची वाढ झाली असून एकुण ठेवी ३ हजार १७५ कोटी रुपये आहेत.एकुण कर्ज वाटप १ हजार ६६७ कोटी रुपये आहे. खेळते भांडवल ३ हजार ९०४ कोटी रुपये आहे.बँकेची एकुण गुंतवणूक १ हजार ५९७ कोटी रुपये इतकी आहे.सदर सभेत शैक्षणिक परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या सभासदांच्या पाल्यांच्या गौरव करण्यात आला.

### पारनेरला १० ऑक्टोबर रोजी आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स निवड चाचणी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स संघटनेच्या वतीने २० व्या राष्ट्रीय थलेटिक्स मैदानी स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ९: ३० वाजता न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथे होणार आहे. या निवड चाचणीत १४ वर्षांखालील व १६ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होऊ शकतात. १४ वर्षांखालील गटात Triathlonaa, Triathlon-B d Triathlon-C या प्रकारांचा समावेश असून, त्यामध्ये ६० मी. धावणे, लांब उडी (५ मी. रन-अप), उंच उडी (Scissor), Back Throw1 (Hrdles) Shot Put आणि ६०० मी. धावणे या प्रकारांचा समावेश आहे. १६ वर्षांखालील गटात ६० मी., १०० मी., ८० मी. अडथळा शर्यत (Hurdles), लांब उडी, गोळा फेक व भाला फेक या प्रकारांचा समावेश आहे. या निवड चाचणीद्वारे मुले व मुली मिळून एकूण १३ गुणवंत खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड केली जाणार आहे. प्रवेशिका ऑनलाइन पद्धतीने दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धा स्थळीच घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्पर्धा हैदराबाद येथे दि. १४ व १६ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे. या जिल्हास्तरीय निवड चाचणीमध्ये कोणतेही जिल्हास्तरीय प्रमाणपत्र दिले जाणार नाही. ही चाचणी केवळ राष्ट्रीय स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाच्या निवडीच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली आहे.

---

# प्रांत कार्यालयातील कर्मचारी वर्षानुवर्षे त्याच आस्थापनेवर कसे?

## दहा-पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांची चौकशीची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगांव : पाथर्डी-शेवगाव उपविभागीय अर्थात प्रांत कार्यालयात काही कर्मचारी गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून एकाच आस्थापनेवर कार्यरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कर्मचारी कसे कार्यरत राहतात, तसेच बदली झाल्यानंतर काही कर्मचारी पुन्हा त्याच आस्थापनेवर कसे येतात, याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.**

यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, पाथर्डी भाग पाथर्डी यांच्याकडे तक्रार निवेदन देण्यात आले आहे. दीर्घकाळ एकाच कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमुळे प्रशासकीय कामकाजात अनियमितता अथवा आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्याची शंका निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

**दहा-पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून?**

प्रांत कार्यालयातील काही कर्मचारी तब्बल दहा ते पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. संबंधित कर्मचारी एवढ्या दीर्घकाळापासून एकाच आस्थापनेवर कसे कार्यरत आहेत, त्यांच्या नियुक्त्या व बदल्यांचे आदेश कोणत्या पद्धतीने झाले, याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच या कर्मचाऱ्यांकडे आतापर्यंत कोणकोणती कामे, टेबल अथवा जबाबदाऱ्या होत्या, त्या कालावधीत त्यांच्या कामकाजात कोणतीही आर्थिक किंवा प्रशासकीय अनियमितता झाली आहे का, याचीही बारकाईने तपासणी करण्यात यावी, अशी मागणी आहे.

**बदलीनंतर पुन्हा त्याच आस्थापनेवर कसे?**

एखाद्या कर्मचाऱ्याची एका ठिकाणाहून बदली झाल्यानंतर तो पुन्हा त्याच आस्थापनेवर किंवा कार्यालयात कशा पद्धतीने परत येतो, याचीही स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. बदलीनंतर पुन्हा त्याच ठिकाणी नियुक्ती मिळण्यामागे कोणाचे आदेश, शिफारस अथवा प्रशासकीय कारणे होती, याची कागदपत्रांच्या आधारे तपासणी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**बाह्य यंत्रणेमार्फत चौकशीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी कार्यालयीन पातळीवर न करता स्वतंत्र किंवा बाह्य यंत्रणेमार्फत करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संबंधित कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच आस्थापनेवर कार्यरत राहण्यामागे कोणाचे पाठबळ किंवा आदेश आहेत, याचीही चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान अनियमितता आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशीची शिफारस करून नियमानुसार कारवाई करावी. तसेच चौकशी पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल निवेदनकर्त्यांना कळवावा, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, निवेदनात करण्यात आलेले आरोप व व्यक्त केलेल्या शंका यांची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार असून, संबंधित कर्मचाऱ्यांची बाजूही चौकशीदरम्यान समोर येणे अपेक्षित आहे.

---

# कर्मवीरांचा विचार व शैक्षणिक वारसा जपा : खा. लंके



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार व शैक्षणिक वारसा जपा असे प्रतिपादन अहिल्यानगर दक्षिणचे खासदार डॉ.निलेश लंके यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथील प्र.ग. खिलारी विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १४९ व्या जयंती कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना खासदार लंके म्हणाले की, बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे कर्मवीर अण्णांचे कार्य प्रेरणादायी आहे. या विद्यालयातील वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच निवासी मुलींसाठी सुसज्ज बेड व्यवस्था उभारण्याच्या कामासही सहकार्य करण्याचे त्यांनी जाहीर केले.

यावेळी ज्ञानदेव पांडुळे, रवींद्र राजदेव, बाळासाहेब खिलारी, मोहन रोकडे, विक्रम झावरे, अर्जुन भालेकर, सरपंच अशोक वाळुंज, सरपंच अरुणाताई खिलारी, रामभाऊ तराळ, सुग्राबी हवालदार, रवींद्र ढोकळे, संदिप गुंजाळ, पंडितराव झावरे, प्रा. सुनीलराव खिलारी, मळीभाऊ रांधवन, सीताराम ढूस, श्रावण गायकवाड, पत्रकार बबनराव गायके, सुभाष खिलारी, गंगाधर बांडे, संदिप व्यवहारे, महादू भालेकर यांच्यासह पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# जिल्हा बँकेच्या पार्श्वभूमीवर मतदार सहलीवर.....

## राम शिंदेंनी कसली निवडणुकीसाठी कंबर... कोणाचा पत्ता होणार कट?

**डॉ. अफरोजखान पठाण। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** जिल्हा सहकारी बँकेच्या वार्षिक अहवालात आपला फोटो प्रसिद्ध न झाल्याची सल विधान परिषदेची सभापती राम शिंदे यांनी प्रत्यक्ष बँकेच्या कार्यक्रमातच उघड बोलून दाखवली होती. त्याचवेळी त्यांनी आजपर्यंत बँकेच्या राजकारणात आपण कधी लक्ष घातले नाही. मात्र असा प्रकार घडत असेल तर आता लक्ष द्यावे लागेल असा इशारा देखील त्यावेळी दिला होता. तो इशारा राम शिंदेंनी पाळत यंदाच्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आपल्या नावाचे ठराव घेत आता होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी कंबर कसली. कर्जत आणि जामखेड तालुक्यातील जिल्हा बँकेचे मतदार सहलीवर देखील रवाना केले. मात्र या शब्दाखाली कोणत्या स्थानिक नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा बळी जाणार आहे ? हे पाहावे लागणार आहे.

**त्यांना उभा राहता येत नाही. उगाच बाऊ करून स्वताची राजकीय उंची वाढवत आहे : रोहित पवार**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठकीस उपस्थित असताना आमदार रोहित पवार यांनी जिल्हा बँकेत राम शिंदे सक्रिय झालेल्या प्रश्नांवर बोचरी टीका केली. पद असताना मतदारसंघात काही करता येत नाही. आणि त्यात निवडणूक लागली की ते सगळीकडे फिरतात. एक तर या निवडणुकीत त्यांना उभा राहता येत नाही. नुसता बाऊ करायचा आणि स्वताची राजकीय उंची वाढवायची. स्वतालाच सगळं मिळावं ही वृत्ती येथील लोक जिरवल्याशिवाय राहणार नाहीत अशी टिपण्णी करीत बार उडवला.

सहकार क्षेत्रातील अहिल्यानगर जिल्हा बँक कायम राज्य आणि नगर जिल्ह्याच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावते. लोकसभा-विधानसभा निवडणुकीत नाराज असलेल्या नेत्यांसाठी बँकेची निवडणूक पर्वणी ठरते. यात सहकार क्षेत्रातील योगदान आणि त्याचा गाढा अभ्यास असणे आवश्यक असते. मागील जिल्हा बँकेच्या वार्षिक अहवालात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचा फोटो प्रसिध्द न झाल्याने कर्जत-जामखेडमध्ये भाजपाने तीव्र निषेध व्यक्त केला होता. हाच धागा पकडत जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत राम शिंदेंनी व्यासपीठावरील तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ तसेच प्रशासनास कोपरखळी मारत आपल्या मनातील सल व्यक्त केली होती. तसेच फोटो न छापल्याची सल बोलून दाखवत आता आपणांस जिल्हा बँकेच्या राजकारणात लक्ष घालावे लागेल असा गर्भित इशारा देखील दिला होता. त्याच अनुषंगाने यंदाच्या जिल्हा बँक निवडणुकीत राम शिंदे यांनी कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यात आपल्या नावाचे ठराव करून घेतले. नुसतेच ठराव न घेता जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी-गाठीवर जोर देत अप्रत्यक्ष विखे पिता-पुत्रांना देखील डीवचण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

दुसरीकडे जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्हयातील नेत्यांचे जोरदार प्रयत्न सुरू असताना राम शिंदे यांनी देखील यास दुजोरा दिला. राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने यावर विचार करीत प्रत्येकाचा मान-सन्मान राखला पाहिजे. मात्र इगोइस्टिक होत बिनविरोध करण्याचा प्रयत्न कोणी केला तर निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे राम शिंदे यांनी स्पष्ट केले.

कर्जतमध्ये भाजपाकडून विखे समर्थक अंबादास पिसाळ आणि राम शिंदे समर्थक आशा काकासाहेब तापकीर हे जिल्हा बँकेवर संचालक होते. यंदा बारडगाव विका सोसायटीने राम शिंदेंचा ठराव एकमुखी पास केल्याने कर्जतच्या कोणाचा पत्ता कट होणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. यात इच्छुकांची संख्या देखील अधिक राहणार असल्याने यंदा बँकेच्या निवडणुकीत रंगत वाढली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर राम शिंदें कर्जत-जामखेड तालुक्यातील मतदारांची बैठक घेत त्यांना सहलीवर देखील रवाना केले आहे. राम शिंदे कर्जतमधून अर्ज दाखल करणार की ? जामखेडमधून हा प्रश्न अनुत्तरित असला तरी जिल्हा बँकेचा संचालक होण्यासाठी ते कोणत्या स्थानिक नेत्याचा किंवा कार्यकर्त्यांचा बळी घेणार हे लवकरच समजेल.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# श्रीगोंद्यात नशेचे जाळे फोफावले; तरुणाई व्यसनाच्या विळख्यात!

## एमडी, गांजा, प्रतिबंधित गोळ्या अन् इतर नशेच्या पदार्थांची राजरोस विक्री



**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहर आणि ग्रामीण परिसरात अवैध व्यवसायांसोबतच गुन्हेगारीचे आव्हान गंभीर बनत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. एमडी, गांजा, प्रतिबंधित नशेच्या गोळ्या आणि इतर अमली पदार्थांच्या उपलब्धतेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नशेचे पदार्थ सहज मिळत असल्याच्या तक्रारींमुळे तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असल्याची भीती व्यक्त होत आहे.या परिस्थितीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. श्रीगोंदा तालुक्यात यापूर्वीही अमली पदार्थांशी विषया संबंधित कारवाया झाल्या आहेत.

पण पुन्हा नशेचा बाजाराणे मोठ्या प्रमाणात डोके वर काढताना दिसत आहे आज श्रीगोंदा तालुक्यात शहरी तसेच ग्रामीण भागात एमडी, गांजा, प्रतिबंधित नशेच्या गोळ्या आणि इतर अमली पदार्थांची श्रीगोंद्यात सहज उपलब्ध होत आहेत श्रीगोंदा शहरासह ग्रामीण भागात नशेचे जाळे वेगाने फोफावत चालले असून, तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत चालली आहे.

शाळा-कॉलेजचे विद्यार्थी आणि तरुण वर्ग या छुप्या अमली पदार्थांच्या विळख्यात सापडत असल्याने अनेक अल्पवयीन मुले-मुली व्यसनाधीन होऊ लागले आहेत त्यामुळे स्थानिक नागरिक आणि पालकांमध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.तालुक्यात विविध ठिकाणी छुप्या मार्गाने होणारी अमली पदार्थांची (गांजा, अंमली गोळ्या, केमिकल ड्रग्स) विक्री आणि विदेशी तसेच गावठी दारूचे अवैध धंदे यामुळे तरुणांना हे पदार्थ सहज उपलब्ध होत आहेत.त्यामुळे व्यसनाधीनतेमुळे तरुणांचे आरोग्य, शिक्षण आणि करिअर उद्ध्वस्त होत आहे.

तसेच यातूनच पुढे स्थानिक पातळीवर गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे.यावर पोलिसांनी काही अंशी कारवाया केल्या असून त्या कमी पडल्या आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही या कारवायांमुळे पुन्हा तेजीत सुरु झालेले अवैध व्यवसायांचे जाळे रोखण्याचे आव्हान अधोरेखित झाले आहे. श्रीगोंद्याची ओळख सुरक्षित आणि शांत शहर म्हणून टिकवायची असेल, तर नशेच्या अवैध बाजारपेठेला आळा घालणे अत्यावश्यक आहे. तरुणाईचे भविष्य वाचवण्यासाठी पोलीस प्रशासन, पालक, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज आहे.

### नशेच्या सहज उपलब्धतेवर नियंत्रण कोणाचे?

तरुणांमध्ये नशेचे आकर्षण वाढत असल्याच्या तक्रारी चिंताजनक आहेत. नशेच्या पदार्थांची विक्री नेमकी कुठे होते, त्यामागे कोणत्या टोळ्या सक्रिय आहेत आणि या व्यवहारांना आर्थिक रसद कोण पुरवते, याचा तपास होणे आवश्यक आहे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही; तर पुरवठादार आणि मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.नशेच्या आहारी गेलेल्या तरुणांचे शिक्षण, रोजगार आणि कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त होण्याचा धोका आहे. व्यसनातून आर्थिक अडचणी, कौटुंबिक वाद आणि काही प्रकरणांत गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय म्हणून नव्हे, तर सामाजिक संकट म्हणूनही पाहण्याची गरज आहे.

### पोलिसांसमोर दुहेरी आव्हान

अवैध धंद्यांवर छापे, अमली पदार्थांची तस्करी रोखणे, संशयित विक्रीच्या ठिकाणांवर लक्ष ठेवणे आणि तरुणांना नशेपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती करणे, अशी दुहेरी जबाबदारी पोलिसांसमोर आहे. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विशेष लक्ष ठेवण्याबरोबरच नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीची गोपनीयता राखून तक्रारींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

---

# ढवळगावात हॉटेल व्यावसायिकाला फायटर व कोयत्याने मारहाण

## २२ हजारांची रोकड व मोबाईल हिसकावल्याची तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : ढवळगाव (ता. श्रीगोंदा) येथील हॉटेल व्यावसायिकास हॉटेलसमोर चौघांनी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी फायटरने डोक्यावर, तर कोयत्याच्या मुठीने पाठीवर मारहाण केल्याचा आरोप असून, खिशातील २२ हजार रुपये रोख रक्कम व सॅमसंग मोबाईल असा एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल काढून घेतल्याची तक्रार बेलवंडी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.




याबाबत आदेश सुरेश आढाव (वय २६, रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. आदेश आढाव यांचे ढवळगाव शिवारात येवतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'हॉटेल रिलॅक्स गार्डन' नावाचे हॉटेल आहे. ते स्वतः हॉटेल व्यवसाय चालवतात. २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास त्यांना रोहन चोरमले याचा फोन आला व हॉटेलच्या रस्त्यावर येण्यास सांगितले. त्यानंतर आढाव हॉटेलकडे गेले असता रोहन चोरमले तेथे उपस्थित होता.

तक्रारीनुसार, रोहनने त्याला व त्याच्या मित्रांना जेवण करायचे असून पैसे नंतर देण्याचे सांगितले. त्यावर आढाव यांनी उधारी बंद असल्याचे सांगून जेवणाचे पैसे देऊन जाण्यास सांगितले. त्यानंतर श्रीधर ठोंबरे, प्रतिक सोबले आणि वैभव झिटे हे तेथे आले.यावेळी श्रीधर ठोंबरे याच्या हातात फायटर आणि प्रतिक सोबले याच्या हातात कोयता असल्याचा आरोप आहे. चौघांनी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. श्रीधर ठोंबरे याने फायटरने डोक्यावर, तर प्रतिक सोबले याने कोयत्याच्या मुठीने पाठीवर मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.सदरील घटना सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झाली आहे.

दरम्यान, आदेश आढाव यांच्या हाफ पॅन्टच्या खिशातील गाय विक्रीतून आलेली २२ हजार रुपयांची रोकड रोहन चोरमले याने, तर दुसऱ्या खिशातील सॅमसंग मोबाईल वैभव झिटे याने काढून घेतल्याचा आरोप आहे. मोबाईलची किंमत १५ हजार रुपये आहे.

मारहाणीनंतर आरोपींनी 'तू कसे काय हॉटेल चालवितो, तुझ्याकडे पाहतो' असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. हॉटेलमधील कामगार मदतीसाठी धावत येत असल्याचे पाहून संबंधित तेथून निघूनगेले.या घटनेत रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेबाबत बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे.

---

# देवळाली प्रवरातील सभासदत्व रद्द करण्याच्या निर्णयाला सहकारमंत्र्यांची स्थगिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि बागायत पीक उत्पादक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांशी संबंधित सभासदत्व रद्द करण्याच्या निर्णयाला सहकारमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे संबंधित सभासदांना मोठा दिलासा मिळाला आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राहुरी यांनी दिलेल्या आदेशाविरोधात संबंधित सभासदांनी विभागीय सहनिबंधकांकडे अपील केले होते. त्यानंतर विभागीय सहनिबंधकांच्या निर्णयाविरोधात सहकारमंत्र्यांकडे पुनर्विचारासाठी अपील दाखल करण्यात आले. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सभासदांच्या वतीने ड. मुकुंद गवारे यांनी युक्तिवाद केला. संबंधित सभासद हे सन २०१३ पूर्वीपासून दोन्ही सहकारी संस्थांचे सभासद असल्याचे अपीलमध्ये नमूद करण्यात आले. त्यामुळे त्यानंतरच्या काळात करण्यात आलेल्या उपविधीतील तरतुदी पूर्वीपासून सभासद असलेल्या सदस्यांना लागू करता येणार नाहीत, असा मुद्दा मांडण्यात आला. दोन्ही सहकारी संस्था जुन्या असून, सभासदत्वासंदर्भातील नंतरच्या तरतुदींचा पूर्वीपासून सभासद असलेल्या सदस्यांवर परिणाम करता येणार नसल्याचेही युक्तिवादात स्पष्ट करण्यात आले.

तसेच संस्थांच्या उपविधीतील संबंधित तरतुदींच्या आधारे सभासदत्व रद्द करण्याच्या निर्णयावर आक्षेप नोंदविण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर सहकारमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी सभासदत्व रद्द करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यामुळे दोन्ही सहकारी संस्थांमधील संबंधित सभासदांना दिलासा मिळाला असून, त्यांच्या सभासदत्वाबाबतचा पुढील निर्णय काय होणार, याकडे आता लक्ष लागले आहे. सुनावणीवेळी देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, नगरसेवक प्रकाश संसारे, अमोल कदम, सौरव मुसमाडे यांच्यासह संबंधित सभासद उपस्थित होते.

---

# रात्रीच्या अंधारात कोंबून नेले होते आठ गोवंश; पोलिसांच्या जागृकतेमुळे सुटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत दाटीवाटीने वाहनात कोंबून आठ गोवंश कत्तलीसाठी घेऊन जात असताना पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्यांची सुटका झाली. लोणी खुर्द येथील वेताळबाबा चौकात नाईट पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांनी कारवाई करून सहा जर्सी गायी आणि दोन गोऱ्ह्यांना सुरक्षित बाहेर काढले. या कारवाईत सुमारे चार लाख रुपये किमतीची बोलेरो मॅक्स पिकअपसह एकूण पाच लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी (ता. ३०) पहाटे सुमारे १.३० वाजता पोलिसांचे पथक वेताळबाबा चौक परिसरात गस्त घालत होते. यावेळी काळी ताडपत्री बांधलेली पांढऱ्या रंगाची बोलेरो मॅक्स पिकअप (क्र. एमएच-२०-जीसी-५०१०) पोलिसांना संशयास्पदरीत्या आढळली. पोलिसांनी वाहन थांबवून ताडपत्री उघडली असता आत सहा जर्सी गायी आणि दोन गोऱ्हे दाटीवाटीने कोंबलेले दिसून आले. वाहनात जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था नव्हती. तसेच प्रवासात त्यांना इजा होऊ नये यासाठी मॅटिंगही करण्यात आलेले नव्हते. या अवस्थेत कोंबलेल्या गोवंशाची सुटका करून पोलिसांनी त्यांना सुरक्षित ताब्यात घेतले. त्यांची अंदाजे किंमत एक लाख ३० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. वाहनचालक अशपाक गणी कुरेशी (वय ३५, रा. खंडाळा, ता. वैजापूर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांच्या फिर्यादीनुसार, सदर गोवंश कत्तलीसाठी घेऊन जात असल्याचे त्याने सांगितले. पोलीस कॉन्स्टेबल अशोक शशिकांत गाढे यांच्या फिर्यादीवरून कुरेशीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी व बाबासाहेब सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश धादवड, अशोक गाढे व होमगार्ड यांनी ही कारवाई केली. तपास पोलीस उपनिरीक्षक संजय विखे करीत आहेत.

---

# प्रेमविवाहाच्या खर्चातील पाच लाखांची मागणी; विवाहितेचा छळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : 'तुम्ही प्रेमविवाह केला आहे. लग्नाला पाच लाख रुपये खर्च आला असून, ते पैसे माहेरून घेऊन ये,' अशी मागणी करून विवाहित तरुणीला मारहाण करत शारीरिक व मानसिक छळ केल्याचा प्रकार राहुरी तालुक्यातील तिळापूर येथे घडल्याचे समोर आले आहे.

जयश्री सोमनाथ सरोदे (वय २३, रा. तिळापूर, ता. राहुरी, सध्या रा. मानोरी) यांनी याबाबत राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जयश्री यांनी सोमनाथ सरोदे यांच्याशी १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आळंदी येथे आंतरजातीय प्रेमविवाह केला होता.

लग्नानंतर सुरुवातीचे सहा महिने पती चांगला वागला. त्यानंतर तो मद्यपान करून मारहाण करू लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याबाबत जयश्री यांनी सासरच्या मंडळींना सांगितले असता, 'तुम्ही प्रेमविवाह केला आहे, तुम्ही दोघे कसेही राहा,' असे म्हणत त्यांनी दुर्लक्ष केले. तसेच लग्नासाठी पाच लाख रुपये खर्च झाल्याचे सांगून ते पैसे माहेरून घेऊन येण्याची मागणी करण्यात आली. पैसे आणले नाही तर नांदवणार नाही, अशी धमकी देत मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पती सोमनाथ आदिनाथ सरोदे, सासू शांता आदिनाथ सरोदे, सासरे आदिनाथ नानासाहेब सरोदे व दीर राहुल आदिनाथ सरोदे (सर्व रा. तिळापूर) यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०९२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ११५(२), ३(५), ३५१(२), ३५२ व ८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

---

# सुवर्णपदक विजेता असलम इनामदारचे टाकळीभानमध्ये जल्लोषात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : जपान येथे २०२६ यावर्षीच्या नुकत्याच पार पडलेल्या आशियाई कबड्डी स्पर्धेत भारतीय संघासाठी महत्वपूर्ण कामगिरी बजावत भारतीय संघाला सुवर्णपदक प्राप्त करून देणारा टाकळीभानचा भूमिपुत्र भारताचा स्टार कबड्डी खेळाडू असलम इनामदार याचे आशियाई कबड्डी स्पर्धा विजयानंतर मातृभूमी टाकळीभान मध्ये काल सायंकाळी ७ वाजता आगमन होताच गावातील क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ मान्यवर यांच्यावतीने ढोल ताशांच्या गजरामध्ये व फटाक्यांच्या आतिषबाजी जल्लोषात स्वागत करण्यात आले.



स्वागत सत्काराचे आयोजन आझाद क्रीडा मंडळ, ओन्ली साई क्रीडा मंडळ, शेतकरी संघटना टाकळीभान, राजेंद्र कोकणे मित्र मंडळ टाकळीभान, जय बजरंग तरुण मंडळ, सन्मित्र क्रीडा मंडळ, संविधान ग्रुप टाकळीभान, श्रीकृष्ण गोपाल संघटना, टाकळीभान यांच्यावतीने करण्यात आले होते. याप्रसंगी गावातील राजेंद्र कोकणे, माजी उपसरपंच भारत भवार, प्रा. कार्लस साठे सर,प्राचार्य जयकर मगर,अर्जुन राऊत, अनिल बोडखे, बापूसाहेब पटारे,रवींद्र गाढे यांनी शुभेच्छा दिल्या व असलम याचे त्याच्या नेत्र दीपक यशाबद्दल भरभरून सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

याप्रसंगी गावातील ज्येष्ठ खेळाडू भैया पठाण, अनिल पटारे सर, कबड्डी प्रशिक्षक राहुल कोकणे, पो. वसीम इनामदार, नूर पठाण, विलास दाभाडे, ड धनराज कोकणे, श्रीधर गाडे,आबासाहेब रणनवरे,बंडोपंत बोडखे,अमोल पटारे,विश्व धावपटू भाऊसाहेब गव्हाणे,सुजित बोडखे, गोरक्षनाथ कोकणे, मेहराज इनामदार,सुदाम पटारे, आदीसह मोठ्या संख्येने गावातील तरुण युवक खेळाडू ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# मोटार हळू चालवा म्हटल्याने मारहाण, तिघं विरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अरे मोटारसायकल हळूच चालवा, नाहीतर घसरुन पडताल, असे म्हणाल्याचा राग आल्याने मोटारसायकलवरील तिघांनी आयुब पठाण यांना शिवीगाळ करुन फायटरने मारहाण करुन जखमी केले. ही घटना दि. २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी राहुरी बस स्थानक समोर घडली. दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास या घटनेतील तीन आरोपी खरेदी विक्री संघासमोर काही महीलांबरोबर वाद घालत होते. तेव्हा रावसाहेब वाघुजी महाले, रा. मुलनमाथा, राहुरी हे त्यांना म्हणाले कि अरे महीलां सोबत वाद घालु नका. याचा राग आल्याने आरोपींनी रावसाहेब महाले यांना शिवीगाळ करुन फायटर व लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपी मोटरसायकलवर राहुरी बसस्थानका समोर वेगात आले. तेथे आयुब पठाण हे त्यांच्या चारचाकी गाडीतून रस्ता पार करत होते. तेव्हा ते आरोपींना म्हणाले कि, अरे मोटारसायकल हळूच चालवा, नाहीतर घसरुन पडताल. तेव्हा आरोपीने त्यांची गचांडी धरुन शिवीगाळ करत म्हणाला कि, मी मोटार सायकलवरुन पडू नाहीतर आमचे काही होवू, तुला काय करायचे. असे म्हणुन आरोपींनी आयुब पठाण यांना शिवीगाळ करुन फायटरने मारहाण करत जखमी केले. घटनेनंतर आयुब पठाण व रावसाहेब महाले यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेतली. आयुब पिरखान पठाण, वय ६२ वर्षे, रा. जुना कनगर रोड, महालक्ष्मी कॉल्पेक्स राहुरी, यांच्या फिर्यादीवरून आरोपी ओंकार नितीन कोरडे, रा. राहुरी व दोन अनोळखी तरुण अशा तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# महिलेला मारहाण करून विनयभंग, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मला तू आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे, असे म्हणत आरोपीने शेतात काम करत असलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचा विनयभंग करुन मारहाण केल्याची घटना २७ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास राहुरी तालुक्यातील मानोरी परिसरात घडली. या घटनेतील पिडीत महिला राहुरी तालुक्यातील मानोरी परीसरात राहते. दि. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास तीच्या शेतात काम करत असताना आरोपी महिलेच्या पाठीमागून आला आणि म्हणाला, मला तू आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे, असे म्हणत त्याने महिलेला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तेव्हा महिलेने आरडा ओरडा केला असता आरोपीने तिचे तोंड दाबून तिला जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच कोणत्या तरी वस्तूने मारहाण केली. तसेच महिलेच्या नाकाला चावा घेतला. नंतर तू जर कोणाला काही सांगितले तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. या झटापटी दरम्यान महिलेच्या गळ्यातील सुमारे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले गहाळ झाले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सतीश सोन्याबापू बर्डे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संभाजी बडे हे करीत आहे.

# मालकाची रक्कम घेऊन शेतमजूर फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मालकाने शेतमजूराला मित्राकडून रोख रक्कम आणण्यास सांगीतले. शेतमजूराने ती हजारो रुपये रोख रक्कम घेऊन पसार झाला. ही घटना दि. २० सप्टेंबर रोजी राहुरी शहर हद्दीत घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सतीष अण्णासाहेब ढवळे, वय ३८ वर्षे, रा. ढवळे वस्ती, वांबोरी, ता. राहुरी, यांनी तीन महिन्या पूर्वी शेती कामासाठी आरोपीला शेतमजूर म्हणून कामावर ठेवले होते. दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी सतीष ढवळे यांना पैशाची गरज असल्याने त्यांनी त्यांचा राहुरी येथील मित्र बाळासाहेब वाघ यांना फोन करुन पैशाची मागणी केली. तेव्हा मित्राने सांगीतले कि, मी राहुरीत आहे, येथे येऊन पैसे घेऊन जा. तेव्हा सतिष ढवळे यांनी त्यांच्या शेतमजूराला मोटरसायकलवर पैसे आणण्यासाठी पाठवीले. तेव्हा आरोपी शेतमजूर हा राहुरीत आला व त्याने बाळासाहेब वाघ यांच्याकडून ४५ हजार रुपये रोख रक्कम घेऊन पसार झाला. सतिष ढवळे यांनी बराच वेळ त्याची वाट पाहिली. मात्र तो आला नाही. नंतर सतिष ढवळे यांनी त्याच्या घरी जाऊन त्याचा शोध घेतला मात्र त्याचा काही तपास लागला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सतीष अण्णासाहेब ढवळे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी सुरज बाबू विठेकर, रा. ढवळे वस्ती, वांबोरी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याने तरुणावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : आरोपी तरुणाने एका अल्पवयीन मुलीला तीच्या घरासमोरुन मोटारसायकलवर बसवून पळवून नेले. ही घटना राहुरी तालुक्यातील एका गावात दि. २५ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. एक १४ वर्षे ९ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी राहुरी तालुक्यातील एका गावात कुटुंबासह राहते. दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास पिडीत मुलगी शेजारी राहणाऱ्या एका मैत्रीणी सोबत घरासमोर गप्पा मारत बसली होती. त्यानंतर थोड्या वेळाने पिडीत मुलीचे वडिल घराच्या बाहेर आले. तेव्हा आरोपी प्रशांत चव्हाण याने पिडीत मुलीला अज्ञात कारणासाठी त्याच्या मोटार सायकलवर बसवुन तिला पळवुन घेऊन गेला. तेव्हा मुलीचे वडिल त्याच्या मोटारसायकलच्या पाठीमागे गेले. परंतु तो अंधारात मोटार सायकल वेगात घेऊन गेला. त्यानंतर मुलीचा परिसरात शोध घेतला. परंतु ती मिळुन आली नाही. मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी प्रशांत शांताराम चव्हाण, रा. तांदुळवाडी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. १०९६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.